cmyk

## संपादकीय

### विरोधकांना निवडणुकांचे उत्सवी राजकारण करून चालणार नाही !

मतचोरी आणि एसआयआरच्या मुद्द्यावर संसदेत चर्चा झाली. टोकदार आरोप विरोधी पक्षनेत्यांकडून केले गेले. सत्ताधाऱ्यांनी त्याला त्यापेक्षा अधिक टोकदार प्रत्युत्तर दिले. वर्तमानातील स्थितीबाबत सुरू झालेली ही चर्चा पाऊण शतक मागे गेली. भूतकाळात जाणे प्रत्येक वेळी वाईट नसते, मात्र काही वेळा तेव्हाच्या घटना कुठेतरी आपल्यालाच निरूत्तर करत असतात.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२८ | सोमवार दि.१५ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### ऑस्ट्रेलियातील बॉन्डी बीचवर गोळीबार; हल्लेखोरासह दहा ठार

**सिडनी :** ऑस्ट्रेलियातील सुप्रसिद्ध बॉन्डी बीचवर रविवारी सशस्त्र हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार करत सामूहिक हत्याकांड घडवले. या घटनेत हल्लेखोरासह दहा जण ठार झाले असून, सुमारे १८ जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. गोळीबाराची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली. अनेक राउंड गोळ्या झाडल्या गेल्याने बीचवर उपस्थित लोकांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. सिडनी मॉर्निंग पोस्टच्या वृत्तानुसार, या गोळीबारात शूटरसह दहा लोक मारले गेले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ज्यू समुदायाचे लोक सण हनुक्का साजरा करण्यासाठी शेकडो लोक बॉन्डी बीचवर जमले होते. याच दरम्यान, हल्लेखोरांनी गोळ्या झाडण्यास सुरुवात केली.

### कोलकातामधील गोंधळप्रकरणी आयोजकाला १४ दिवसांची कोठडी

**कोलकाता :** अर्जेंटिनाचा फुटबॉल आयकॉन लिओनेल मेस्सीच्या बहुचर्चित भारत दौऱ्याच्या मुख्य आयोजकाला न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. शनिवारी कोलकात्यातील एका कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर गोंधळ आणि तोडफोड झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. मेस्सीच्या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक शताद्रू दत्त यांना विवेकानंद युवा भारती क्रीडांगण (साल्ट लेक स्टेडियम) येथे सार्वजनिक व्यवस्थेचे उल्लंघन केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. रविवारी त्यांना विधाननगर कोर्टात हजर करण्यात आले. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी न्यायालयाबाहेर निदर्शने केली आणि आयोजकांनी प्रेक्षकांची फसवणूक केल्याचा आरोप करत घोषणाबाजी केली.

### केरळात काँग्रेसचे पुनरागमन

**कोच्ची :** शनिवारी लागलेल्या केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये राज्यात दहा वर्षांपासून सत्ता असलेल्या डाव्या पक्षांचा आघाडीची मोठी पीछेहाट झाली. तर राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने जोरदार मुसंडी मारली आहे. तसेच आतापर्यंत केरळमध्ये नाममात्र अस्तित्व असलेल्या भाजपने राज्यातील शहरी भागांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. आता या निकालांमुळे केरळमधील राजकीय हवा बदलत असल्याचे संकेत मिळत असून या निकालांचा २०२६ मध्ये होणाऱ्या केरळमधील विधानसभा निवडणुकीवर काय परिणाम होईल, याबाबच वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत. केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निकालांना २०२६ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी वाहत असलेल्या राजकीय हवेची दिशा स्पष्ट केली आहे.

### एकट्या विदर्भात ५ लाख कोटींची गुंतवणूक

**नागपूर :** १५ लाख ७२ हजार कोटींपैकी ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक एकट्या विदर्भात करण्यात आली आहे. सामंजस्य करार नुसतेच होत नाही तर अमलात देखील आणले जातात. देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ३१ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. विदर्भाच्या विकासाचा आणि गुंतवणुकीचा विचार केला तर गडचिरोली गुंतवणुकीचं नवं मॅग्नेट तयार होतंय. गडचिरोलीत आता सर्वाधिक गुंतवणूक होते असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हिवाळी अधिवेशनातील (२०२५) अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रासह विदर्भ मराठवाड्यातील गुंतवणुकीबाबत माहिती देताना सांगितलं (२०२५) कि, मिहानमध्ये ३१ कंपनी कार्यरत आहे. तर आणखी २२ कंपनी सुरु होत आहे.

# सीसीआय केंद्रावर शेतकऱ्यांकडे पैशांची मागणी हमीभाव केंद्रावरील वसुलीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर

पुणे । प्रतिनिधी

**सीसीआयच्या खरेदी केंद्रावर कापसाची प्रत चांगली दाखवण्यासाठी पैशाची मागणी होत असल्याचा आरोप राज्यातील अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांकडून होत आहे. यवतमाळमध्ये तर या प्रकरणाची थेट लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार करण्यात आली आहे. यामुळे पुन्हा एकदा हमीभाव केंद्रावरील वसुलीचा मुद्दा ऐरणीवर आला असून, शासनाने यात पारदर्शकपणा आणण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.**



राज्यात वेगवेगळ्या केंद्रावर सीसीआयची हमीभाव खरेदी सुरू करण्यात आली आहे. या ठिकाणी सीसीआय ग्रेडरकडून कापसाच्या प्रत तपासणीचे काम होते. त्यासोबतच शेतकऱ्यांची इतर बाबींमध्ये लूट होऊ नये याकरिता बाजार समिती कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सनियंत्रण केले जाते. ही सारी व्यवस्था शेतकऱ्यांचे शोषण होऊ नये याकरिता असली तरी मात्र याच यंत्रणेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची लूट केली जात असल्याचा आरोप आता होत असून, तशा तक्रारी समोर येऊ लागल्या आहेत. सीसीआयला कापूस विकण्यासाठी कपास किसान ॲपवर नोंदणी करावी लागते. त्याकरिता सातबारा ऑनलाइन करण्यासोबतच कापसाची प्रत योग्य दर्शविण्यासाठी तीन हजार रुपयांची आकारणी शेतकऱ्यांकडून केली जाते. याचा दर प्रति वाहन याप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार बाजार समिती कर्मचाऱ्यांकडून रोज एक ते दीड लाख रुपये वसूल केले जातात, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

शेतकरी कापूस विक्रीसाठी कपास किसान ॲपवर नोंदणी करतात मात्र त्यानंतर त्यांना विविध टप्प्यांवर सहकार्य करण्यासाठी सुमारे वीस हजार रुपयांची मागणी करण्यात येते, अशी अनेक शेतकऱ्यांची तक्रार आहे. काही ठिकाणाहून तर गंभीर स्वरूपाच्या तक्रारी येत आहेत. शेतकऱ्यांकडून कमी दरात कापूस खरेदी करून त्यांच्याच सातबारावर सीसीआयला विकून तो कापूस ज्यादा दराने विकण्याचा काहीजण या ठिकाणी उद्योग करीत असल्याचेही सांगण्यात येत आहे. याला कोणी विरोध केला तर शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. या सगळ्या प्रकाराला आळा घालण्याची मागणी होत आहे.

# महाराष्ट्रातील सामाजिक समता संपलीय–धनंजय मुंडे

## असे नाही, कायदा आहे कडक कारवाई करू – मुख्यमंत्री

नागपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रात आजघडीला सामाजिक आंदोलन करणारा कार्यकर्ता सुरक्षितपणे फिरु शकत नाही. या महाराष्ट्रातील सामाजिक समता संपली आहे, असे वक्तव्य परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले. ते रविवारी विधानसभेत बोलत होते. यावेळी त्यांनी सभागृहात ॲड. मंगेश ससाणे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा मुद्दा उपस्थित करत राज्यातील कायदा व सुव्यवस्थेविषयी चिंता व्यक्त केली. यावर मुख्यमंत्र्यांनी राज्यात कायदा आहे आणि अश्या लोकांवर कडक कारवाई होईल, असे सांगत एका मिनिटात विषय संपवला.



धनंजय मुंडे यांनी सभागृहात ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाणे यांच्यावरील हल्ल्याबाबत सविस्तर भाष्य केले. प्रसिद्ध वकील व ओबीसी आंदोलन अभ्यासक मंगेश ससाणे यांच्या वाहनावर मध्यरात्री हल्ला झाला. काही दिवसांपूर्वी लक्ष्मण हाके यांच्या सहकाऱ्यावर माजलगावमध्ये जीवघेणा हल्ला झाला होता. काही जणांनी झुंड करुन त्यांचे हातपाय तोडले. ते अजूनही व्यवस्थितरित्या चालू शकत नाही. यामधील एकही आरोपी पकडला गेलेला नाही. ओबीसी आंदोलक वाघमारे यांच्यावरही हल्ला झाला होता. त्यामुळे आजघडीला महाराष्ट्रात सामाजिक आंदोलन करणारा कार्यकर्ता सुरक्षितपणे फिरु शकतो का?,

◀◀ पान २ वर



## देशातील अणुऊर्जा क्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले होणार; संसदेत आज सादर होईल विधेयक

नवी दिल्ली । वृत्तसेवा

भारत एका मोठ्या ऊर्जा सुधारणेकडे वाटचाल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केंद्र सरकार सोमवारी संसदेत अणुऊर्जा सुधारणा विधेयक मांडत आहे. या ऐतिहासिक पावलामुळे देशातील अणुऊर्जा क्षेत्र पहिल्यांदाच खासगी कंपन्यांसाठी खुले होईल. आतापर्यंत हे क्षेत्र पूर्णपणे सरकारी नियंत्रणाखाली होते.

मंत्रिमंडळाने या विधेयकाला आधीच मंजुरी दिली आहे आणि सोमवारी संसदेत त्यावर चर्चा केली जाईल. या विधेयकाचे उद्दिष्ट खासगी कंपन्यांना अणुऊर्जा निर्मितीमध्ये सहभागी होण्याची परवानगी देणे आहे. यामुळे भारताला १०० गिगावॅट अणुऊर्जा क्षमता साध्य करण्यास मदत होईल, जी देशाच्या स्वच्छ ऊर्जा आणि निव्वळ–शून्य

◀◀ पान २ वर

## ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाने यांच्या गाडीवर हल्ला

धारूर । प्रतिनिधी

ओबीसी आंदोलक ॲड.मंगेश ससाने हे शनिवारी माजलगाव येथे पवन करवर यांच्यावर झालेल्या हल्ल्या संदर्भात आरोपींना अटक का करण्यात आली नाही यासाठी पोलीस ठाण्यात गेले होते.



त्यानंतर ते धारूर मार्गे परत जात असताना अज्ञात मोटारसायकलस्वारांनी त्यांची गाडी अडवून त्यांच्यावर हल्ला केला. या प्रकरणी धारूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, यातील आरोपींना तात्काळ अटक

◀◀ पान २ वर

## १ जुलैपर्यंत कर्जमाफी योजनेची घोषणा करु मुख्यमंत्री फडणवीस यांची विधानसभेत माहिती

नागपूर । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी समिती नेमली आहे. याचा शेतकऱ्यांना फायदा व्हावा, बँकांना नाही. १ जुलैपर्यंत कर्जमाफी योजनेची घोषणा करु, असे रविवारी (दि.१४) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना सांगितले.



सरकारने २०१७ आणि २०२० मध्ये कर्जमाफी केली. तरीही शेतकरी कर्जमाफी मागतोय. याचा अर्थ कुठे तरी नियोजनात आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीत अडचण आहे. यावर उपायोयजना म्हणून आम्ही कर्जमाफी करु, असे फडणवीस म्हणाले. शेतकऱ्यांना सौरऊजर्जेवर कृषीपंप योजना सुरु केली. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. लोकप्रिय योजनेत लाडक्या बहिणींनंतर या योजनेचा नंबर लागेल, असे त्यांनी नमूद केले. कापूस खरेदीच्या मुद्यावर बोलताना ते म्हणाले की, सीसीआयने उत्पादकतेवर आधारित कापूस खरेदीचा नर्णय घेतला. पण उत्पादकता १२ क्विंटल आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. आम्ही याबाबत केंद्र सरकारशी चर्चा

◀◀ पान २ वर



## भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नितीन नबीन


नवीदिल्ली । वृत्तसेवा

भारतीय जनता पक्षाच्या गोटातून एक मोठी बातमी समोर येत आहे. भाजपने नवीन राष्ट्रीय अध्यक्षांची घोषणा केली आहे. बिहार सरकारचे मंत्री नितीन नबीन यांची पक्षाचे नवे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जे पी नड्डा यांचा अध्यक्षपादाचा कार्यकाळ संपला आहे. त्यानंतर आता नितीन नवीन हे पक्षाच्या जबाबदाऱ्या स्वीकारतील. याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसांनी जारी केलेल्या पत्रात म्हटले आहे की, ''भारतीय जनता पक्षाच्या संसदीय मंडळाने बिहार सरकारमधील मंत्री नितीन नबीन यांची भाजपचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळं आता भाजपला नवीन अध्यक्ष मिळाले आहेत. भाजप अध्यक्ष हे संविधानिक किंवा सरकारी पद नाही. त्यामुळे त्यांना सरकारकडून कोणतेही वेतन दिले

## लग्न लावण्यासाठी १० लाख दिले पण ३ महिन्यात वधू झाली गायब

बीड । प्रतिनिधी



लग्न जुळवून देण्याचे आमिष दाखवून एका ३९ वर्षीय तरुणाला तब्बल १० लाख रुपये आणि सोन्याच्या दागिन्यांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना बीड शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी वधू आणि तिच्या

◀◀ पान २ वर

## सामान्य कुटुंबांतील व्यक्तींना पाठिंबा देण्याची गरज - शरद पवार

मुंबई । प्रतिनिधी

प्रतिभा आणि नेतृत्व हे केवळ विशेषाधिकार असलेल्या पार्श्वभूमीच्या व्यक्तींपुरते मर्यादित नसते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सामान्य कुटुंबांतील सक्षम व्यक्तींना ओळखून त्यांना पाठिंबा देण्याची गरज असल्याचे



राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अधोरेखित केले. यशवंतराव चव्हाण केंद्रात आयोजित शरद पवार इन्स्पायर फेलोशिप पुरस्कार वितरण समारंभात पवार बोलत होते.

पवार म्हणाले, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे जीवन आणि मूल्यांचा विचार करून हा फेलोशिप कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.०० क्विंटल | २,३६१ | ३,१०१ | २,७२४ |
| ज्वारी/हायब्रिड : १७.०० क्विंटल | १,८०० | ३,१०० | २,५८२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१९.५० क्विंटल | ४,५०० | ५,५७३ | ४,९५४ |
| बाजरी: २६.५० क्विंटल | २,६०० | ३,२१० | २,९२२ |
| मुग: १.५० क्विंटल | ५,८५० | ५,८५० | ५,८५० |
| सोयाबीन: १५.०० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |

## शक्तिपीठ मार्गाची दिशा बदलली आता सोलापूर, सांगलीमधून जाणार मार्ग

पुणे । प्रतिनिधी

नागपूर ते गोवा या प्रस्तावित शक्तिपीठ मार्गाला विरोध होत असतानाच राज्य सरकारने या मार्गाचे संरेखन (अलायनमेंट) बदलण्याचा निर्णय घेतला असून, नवा मार्ग सोलापूर आणि सांगलीतून जाणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे.




देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात बोलताना सांगितले की, नागपूर – गोवा द्रुतगति मार्ग हा एक अतिशय महत्त्वाचा महामार्ग आहे त्याचे नाव जरी नागपूर – गोवा असले तरी देखील याचा सर्वाधिक फायदा हा मराठवाड्याला होणार आहे. मराठवाड्याचे चित्र हा एक महामार्ग

◀◀ पान २ वर

## निवडणूक आयोग भाजपासाठी काम करते

**रामलीला मैदानावरील काँग्रेसच्या सभेतून राहुल गांधींचा मोदी सरकारवर निशाणा**

नवी दिल्ली । वृत्तसेवा

मत चोरी आणि मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) विरोधात दिल्लीच्या रामलीला मैदानावर रविवारी काँग्रेसच्या वतीने सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभेला संबोधित करताना राहुल गांधींनी आरएसएस आणि भाजपवर जोरदार निशाणा साधला. त्यांनी आरोप केला की, निवडणूक आयोग भाजपसाठी काम करत आहे. मी प्रश्न विचारले पण निवडणूक आयोगाने उत्तर दिले नाही.



लोकसभा विरोधीपक्ष नेते राहुल गांधी म्हणाले, मी येथे येत असताना मला सांगण्यात आले की मोहन भागवत यांनी अंदमान आणि निकोबारमध्ये एक विधान केले होते. गांधीजी म्हणायचे की, सत्य ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. आपल्या धर्मात सत्य ही सर्वात

◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# विरोधकांना निवडणुकांचे उत्सवी राजकारण करून चालणार नाही !

मतचोरी आणि एसआयआरच्या मुद्द्यावर संसदेत चर्चा झाली. टोकदार आरोप विरोधी पक्षनेत्यांकडून केले गेले. सत्ताधाऱ्यांनी त्याला त्यापेक्षा अधिक टोकदार प्रत्युत्तर दिले. वर्तमानातील स्थितीबाबत सुरू झालेली ही चर्चा पाऊण शतक मागे गेली. भूतकाळात जाणे प्रत्येक वेळी वाईट नसते, मात्र काही वेळा तेव्हाच्या घटना कुठेतरी आपल्यालाच निरूत्तर करत असतात. याची दक्षता घेताना आता मतचोरीचा मुद्दा रेटून कुठपर्यंत रेटायचा याचा विरोधी पक्षाला विचार करावा लागणार आहे. त्याचे कारण प्रत्येक विषय जर शेवटी इतिहास आणि घराण्यापर्यंतच नेला जाणार असेल तर त्यांच्या मुद्द्यातील गांभीर्य यातच हरवून जाते आणि आजच्या स्थितीत नागरिकांना विरोधी पक्षांकडून काय अपेक्षा आहे ते मिळण्यात विलंब किंवा अपेक्षाभंगच होणार असेल तर विरोधी पक्षाचीच ही दुहेरी कोंडी ठरेल.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा संसदेत सक्षमपणे मांडला. त्यांना पक्षातील आणि विरोधी आघाडीतील अन्य काही नेत्यांची सुसंगत साथ मिळाली. सरकारच्या बाजूने गृहमंत्री अमित शहा यांनी उत्तर दिले. त्यांनी १९५२ पासून सुरुवात केली. त्याच्याही अगोदरचे एक उदाहरण देत त्यांनी मतचोरीचा मुद्दा उद्धृत करण्याचा प्रयत्न केला. राहुल यांचा आरोप असलेली मतचोरी शहांनी मतचोरीच्या संदर्भात दिलेल्या तीन उदाहरणांमुळे वेगळ्याच दिशेने गेली. विरोधक त्यांचे काम करत आहेत व त्यांनी ते करावेच; तथापि, आता ज्या इतिहासातील दाखले त्यांना दिले जात आहेत तेथूनच पुन्हा नव्याने सुरुवात करावी का याचाही जरूर विचार करावा. जेव्हा एखादे दार उघडणारच नसेल तर वेगळे पर्याय हाताळून मार्ग तयार करावा लागतो. ती संधी अजूनही विरोधकांकडे आहे. एका निवडणुकीतील पराभवामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सर्व विरोधी पक्ष एकतर अज्ञातवासात जातात किंवा त्याच आरोपांची मालिका कायम ठेवतात. भारतीय जनता पार्टी मात्र विजयी झाल्यावरही गाफील राहत नाही, हे त्यांचे बलस्थान आहे. दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि बिहार या प्रत्येक निवडणुकीत हेच दिसले. मतचोरी आणि ईव्हीएमकडे बोट दाखवताना आपल्या त्रुटीही ध्यानात घेणे आवश्यक. बिहारच्या विजयानंतर भाजप पुढच्या आसाम, बंगाल, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुकांच्या तयारीलाही लागला आहे. विरोधक अजूनही हरियाणाच्या निकालापाशीच थांबलेले दिसतात. विरोधी आघाडीतील प्रमुख नेते एकांड्या शिलेदारासारखे लढत आहेत. तेही असे शिलेदार आहेत ज्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप आहे. त्या आरोपातच त्यांना गुरफटून ठेवल्यावर तेच होते जे बिहारमध्ये तेजस्वी यादव यांचे झाले. जंगलराजच्या इतिहासातून त्यांना बाहेर पडताच आले नाही. बदल घडवला तो फक्त झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन यांनी. घराणेशाही आणि इतिहासातील घोटाळ्यांचा बोजा त्यांच्यावरही होता, तथापि, त्यांनी वेळीच भाजपचीच राज्ये असलेल्या मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि हरियाणातील महिला वर्गाला आकर्षित करणाऱ्या योजनांचा अभ्यास करून त्या आपल्या राज्यात राबवल्या. असे करून केवळ सत्ता राखलीच नाही तर मागच्या वेळेपेक्षा जास्त जागाही जिंकल्या. भारतीय राजकारणातील सध्याची अवस्था पाहता मोठा बदल सर्वच स्तरावर होणे अपेक्षित आहे. विरोधकांना द्विधा अवस्थेत न राहता पूर्ण वेळ राजकारण करावे लागणार आहे. निवडणुकीच्या उत्सवापुरती सक्रियता सोडून पूर्णत: झोकून काम करावे लागेल. नेता सतत उपलब्ध आहे आणि आपल्यासोबतच आहे हा विश्वास जेव्हा कार्यकर्त्यांच्या मनात जागतो तेव्हा त्या पक्षसंघटनेत चैतन्य असते. ऐनवेळी प्रकट व्हायचे आणि मतदान झाल्यावर गायब व्हायचे ही बदलत्या राजकारणाला न मानवणारी पद्धती सोडावी लागेल. दशकभरात झालेल्या निवडणुका आणि त्यात मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा ट्रेंड पाहता मतदार मनाशी खूणगाठ बांधून मतदान करत असल्याचे दिसते. रेवडीच्या राजकारणाचा काही भाग असला तरी मतदारासाठी त्याच्या गरजा, आशा-अपेक्षा महत्त्वाच्या आहेत. त्या इतक्या महत्त्वाच्या आहेत की जाती-पातीच्या विभागणीच्या पलिकडे जाऊन स्वत:चा विचार तो करतो आहे. मतदाराला गोंधळ, गदारोळ, आरोप आणि इतिहासाची चर्चा आणि दाखले नको आहेत. त्याला समस्या आणि प्रश्नही नको आहेत तर त्यावर उत्तर देणारे आणि समस्या सोडवणारे हवे आहेत. विरोधकांना वेगळे उपचार करावे लागतील आणि गरज पडल्यास आंदोलनाचा मार्गही पत्करावा लागेल. तेही प्रतिकात्मक आणि सोशल मीडियावरील फोटोपुरते मर्यादित न राहता जनमानस चाळवणारे हवे. मुद्द्यांवर हवे आणि मतदाराच्या भविष्यातील आकांक्षांशी निगडीत हवे. तेजस्वी यादव यांना बिहारच्या इतिहासात, उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राच्या इतिहासात आणि राहुल गांधी यांना त्यांच्या पक्षाच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात अशा असंख्य आंदोलनांचे दाखले मिळतील. अखिलेश यादव यांनाही उत्तर प्रदेशातील पारंपरिक समीकरणांना छेद देत नवे गणित मांडावे लागेल.

विदेशी राज्यकर्त्यांकडून आणि नंतर स्वकीयांकडूनही लाठ्या काठ्या खाण्याचा आणि तुरूंगवारी करण्याचा बहुतेक पक्षांचा इतिहास आहे. प्रादेशिक अस्मितेसाठीच्या आणि शेतकरी-कामगारांच्या आंदोलनांचा इतिहास आहे. वैषम्य असे की या पक्षांचे वारस आज घराणेशाहीच्या मानसिकतेतच आणि त्यावरून होणाऱ्या आरोपांमुळे इतके बंदीस्त आहेत की त्यांच्याच पक्षांच्या अगोदरच्या आंदोलनांचा भूतकाळच ते विसरले आहेत. त्यांचे पक्ष एका रात्रीत सत्तेपर्यंत पाहोचले नव्हते. समस्या घराणेशाहीच्या आरोपांची नाही तर त्याच मानसिकतेत केवळ तत्कालीक नेतागिरी करणे ही आहे. सत्तेचा मार्ग हा कायम जनतेसोबत रस्त्यावर राहूनच जातो. तो संघर्ष माध्यमांत केलेल्या गदारोळाऐवजी रस्त्यांवरच दिसायला हवा. स्वस्थ लोकशाहीसाठी स्वस्थ विरोधी पक्ष हवा, असे मानणारा मोठा वर्ग आहे. हे ध्यानात न घेता केवळ निवडणुकांचे उत्सवी राजकारण करण्यात धन्यता मानली, तर विरोधकांच्या आणि लोकशाहीच्याही हाती काही लागणार नाही.

## पान ६ वरून...

### फुलसांगवी शिवारात

केली आहे. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे फुलसांगवी परिसरामध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी या गावाच्या परिसरामध्ये रब्बी हंगामाची शेतीचे कामे मोठ्या जोमाने चालू आहेत. एकीकडे शेतकऱ्यांना शेतातील कामे वेळेत करणे आव्हानात्मक झाले असताना या कामांना आता बिबट्याच्या दहशतीची मोठी खिळ बसली आहे. शिरूर कासार तालुक्यामध्ये बिबट्याच्या दहशतीने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे मोठे धास्तीचे झाले आहे. शिरूर तालुक्यातील फुलसांगवी या गावांमध्ये शिवारामध्ये सुभाष भुजंगराव ढाकणे या फुलसांगवी मार्कडवाडी रस्त्या लगतच्या शेतकऱ्याच्या १६३ मधील शेतामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील बिगवण येथील मेंढपाळांनी मेंढ्यांचा कळप बसवलेला होता. याच ठिकाणी त्यांनी आपली जागलही ठेवली होती. शनिवार दि. १३ डिसेंबरच्या मध्यरात्री रात्री एक ते दीड च्या दरम्यान या मेंढपाळाच्या जागली वरती बिबट्याने हल्ला चढवून येथील या मेंढपाळाच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या घोड्याची व एका मेंढीची शिकार केली आहे. घोड्याच्या नरड्याचा चावा घेऊन त्याला गतप्राणी केले व त्याचे पोटाजवळील मांस भक्षण करून त्या ठिकाणाहून बिबट्या पसार झाला असल्याचे सांगितले आहे.

सदरील घटनेची माहिती पाटोदा वन विभागाला दिल्यानंतर वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन या घटनेचा पंचनामा केला आहे. या घटनेमध्ये सुमारे सत्तर ते पंच्याहत्तर हजार रुपये हजार रुपये किमतीचा घोडा व पंधरा ते वीस हजार रुपये किमतीची मेंढी असा सुमारे एक लाख रुपये किमतीची पशुधन बिबट्याच्या भक्षस्थानी ठरले आहेत. सदरील घटना फुलसांगवी परिसरामध्ये पहिल्यांदाच घडत असल्याने बिबट्याच्या दहशतीने परिसरातील शेतकरी वर्ग पुरताच हादरून गेला आहे. खरीप हंगामातील शेती कामालाही मोठी खिळ बसली आहे. या बिबट्याच्या लवकरात लवकर बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्याला वन विभागाने भयमुक्त करावे अशी शेतकऱ्यातून मागणी जोर धरत आहे.

### सातवे सिंदफणा मराठी

एज्यूकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई सदस्य प्रसिद्ध कवी दासू वैद्य आणि डॉ. राजेश गायकवाड, प्राचार्य दीपाताई क्षीरसागर, भास्कर बडे, दगडू लोमटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते उद्घाटनाने सकाळी प्रारंभ होईल.

पाठ्यपुस्तकातील कवी डॉ. कैलास दौंड यांची मुलाखत कवी लक्ष्मण खेडकर आणि सुर्यकांत नेटके घेतील. दुपारच्या सत्रात 'शेतीचे प्रश्न, सरकारी धोरण आणि मराठी लेखक' या विषयावर मसापचे डॉ. दादा गोरे यांचे अध्यक्षतेत डॉ. गणेश मोहिते छ. संभाजीनगर, कालिदास आपेट, रमेश जाधव पुणे, जगन्नाथ कदम, डॉ .सोपान सुरवसे यांच्या सहभागाने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर तालुक्यातील पाच शेतकऱ्यांना सिंदफणा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात करण्यात येणार आहे. कथाकार प्रकाश भूते यांच्या अध्यक्षतेत दुपारच्या सत्रात कथाकथन कार्यक्रमामध्ये भास्कर बडे, कविता सोनटक्के, गोरख शेंद्रे, ल.कि.दिवटे, आशोक नजान यांचा सहभाग राहील. नेहमी प्रमाणे जिल्हास्तरीय सातव्या मराठी साहित्य संमेलनाची शिरुरकासार तालुक्यातील साहित्यप्रेमी, नागरिकांमध्ये उत्साह आहे. संमेलनाची जय्यत तयारी करण्यात आली असून शहरामध्ये जागोजागी कमानी उभारण्यात आल्या आहेत. नेत्रदिपक अशा रांगोळींनी स्वागतासाठी संमेलनस्थळ सज्ज झाले आहे. त्याचबरोबर शासकीय ग्रंथविक्री, चित्रप्रदर्शन, ग्रंथप्रदर्शन यासाठी दालन निर्मितीही करण्यात आली आहे. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सिंदफणा सेवाभावी संस्थेच्या वतीने हे संमेलन एकलव्य विद्यालयात होत असून ग्रंथखरेदीसह साहित्य संमेलनाची शिरुरकरांना उत्सुकता आहे.

### शहर व परिसरातील बारवांची

असणाऱ्या आई तुळजाभवानी प्रतिष्ठान, बीडचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. बारव भेटीच्या वेळी अंबड येथील होळकरशाही अभ्यासक रामभाऊ लांडे, बीड येथील दुर्ग अभ्यासक कचरू चांभारे, सामाजिक कार्यकर्ते रामनाथजी खोड, बारव समितीचे सदस्य, बीड मधील महेश खाडे, पत्रकार व समाजसेवक दत्ता प्रभाळे यांच्यासह अनेक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विश्वासघाताची साखळी उघड

आहेत'' अशी खात्री देऊन आरोपी नागरिकांचा विश्वास संपादन करीत होता. फायनान्समध्ये काम करतो अशी ओळख असल्यामुळे नागरिकांनी त्याच्यावर विश्वास ठेवून सदर मोटरसायकली खरेदी केल्या.

गाड्या आणि पैसे दोन्ही गमावले नागरिकांचे दुहेरी नुकसान

बीड शहर पोलिसांच्या तपासात सदर मोटरसायकली चोरीच्या असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्या सर्व मोटरसायकली पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

या कारवाईमुळे संबंधित खरेदीदारांना

✻ खरेदी केलेल्या मोटरसायकली गमवाव्या लागल्या

✻ तसेच त्या बदल्यात दिलेली रक्कमही गमवावी लागली

अशा प्रकारे नागरिकांचे दुहेरी आर्थिक नुकसान झाले आहे.

पोलीस कारवाई

मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी बीड शहर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपास करून आरोपीस अटक केली असून, त्याच्याकडून विविध ठिकाणांहून चोरीस गेलेल्या आठ मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. महेश जाधव, पोलीस अंमलदार श्री. गहिनीनाथ बावनकर, पोलीस अंमलदार श्री. राम पवार, पोलीस अंमलदार श्री. इलियास शेख , मंगेश शिंदे, पोलीस अंमलदार श्री. शौकत शेख तसेच बीड शहर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच पथकातील इतर अधिकारी व अंमलदारांचा विशेष सहभाग होता. यातून शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील मोटरसायकलचे गुन्हे उघडकीस आले असून.. आणखी गुन्ह्यातील सहभाग्? सिद्ध आणि निश्चित होणार आहे..

पोलीसांचे आवाहन

बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की

✻ दुचाकी वाहने नेहमी सुरक्षित व सीसीटीव्ही कॅमेरे असलेल्या ठिकाणीच पार्क करावीत.

✻ वाहन दोन वर्षांपेक्षा जुने असल्यास, त्यास डबल लॉक, हँडल लॉक तसेच आवश्यकतेनुसार व्हील लॉक वापरावे.✻ ''फायनान्सची गाडी आहे'', ''ओढून आणलेली आहे'' अशा कारणांवर वाहन खरेदी करताना संपूर्ण कागदपत्रांची खातरजमा केल्याशिवाय व्यवहार करू नये.✻ संशयास्पद व्यक्ती, वाहन किंवा व्यवहार आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.मोटरसायकल चोरीसारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी बीड शहर पोलीस कटिबद्ध असून, नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

### समाजाच्या भल्यासाठी

शेतकरी आत्महत्या नव्हे सिस्टीमचा बळी -अमर हबीब

आज शेतकऱ्यांची व्याख्या करणे कठीण झाले आहे .अनेक जण शेतीचे मालक असतात मात्र त्यांची उपजीविका व्यापारावर ,नोकरीवर अवलंबून असते .मात्र ज्यांची उपजीविकाच शेतीवर अवलंबून आहे तोच खरा शेतकरी अशी व्याख्या ठरली पाहिजे .आणि त्याप्रमाणे शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे.आपण वृत्तपत्रांतून वाचतो एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली की शेतकऱ्याची आत्महत्या असी आपण बातमी लिहितो. मात्र त्याच्या पाठीमागची कारण आपण शोधली पाहिजेत एखाद्या शेतकऱ्याची मुलगी सासरी आसतांना ज्या बापाला त्रास होतो आणि पैशाची मागणी होते. त्यावेळी शेतकरी सांगतो बाई कापूस विकल्यानंतर तुला पैसे देईल. मात्र आसमानी संकटापुढे शेतकरी हतबल होतो आणि त्याचा कापूस कधीच येत नाही आणि आला तरी सिस्टीम मुळे त्याच्या कापसाला भाव येत नाही. आणि अशा परिस्थितीत मग त्याला आत्महत्या शिवाय पर्याय राहत नाही या आत्महत्येला सिस्टीमचा बळी असे नाव द्यायला हरकत नाही. सरकार शेतकऱ्यांसाठी ज्या योजना आणते त्यात अनेक त्रुटी आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला भाव मिळणे अत्यंत गरजेचे असतानाही केवळ वेगवेगळ्या घोषणा करणे एवढेच सरकार करते. शेतकरी विरोधी धोरणेच शेतकऱ्याच्या आत्महत्यांना कारणीभूत आहेत असे माझे ठाम मत आहे. याच्या विरोधात आम्ही सातत्याने आंदोलन करतो. त्यासाठी एक दिवस उपवास करतो. या आंदोलनाला मराठी पत्रकार परिषदेने किमान आपल्या पूर्वजांसाठी आपण काम केले पाहिजे. शेवटी शेतकरी टिकला तर देश टिकेल या भूमिकेतून पत्रकारांनी शेतकऱ्यांसाठी चळवळ उभी करावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी सुहास देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी आलेल्या पाहुण्या कडून अनेक अपेक्षा व्यक्त केल्या. ज्यावेळेस पत्रकार अडचणीत असतात किंवा आजारी असतात त्यावेळी त्याच्यासाठी कोणीही पुढे येत नाही. जोपर्यंत कामात असतो तोपर्यंत त्याची किंमत ठेवतात. नंतर मात्र त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. किमान सरकारने तरी पत्रकारांसाठी अशी ठोस योजना आणावी. जो निधी दिला जातो ततो तुटपुंजा असल्याने पत्रकारांची पेन्शन योजना असो की आधिस्वीकृती चा प्रश्न असो किंवा आरोग्याचा प्रश्न असो याकडे सरकारचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. या सर्व बाबींसाठी आता सकारात्मक विचार करून पत्रकारांसाठी भरीव मदत करावी अशी अपेक्षा मंगेश चिवटे यांच्याकडून देशमुख यांनी केली. याचवेळी पोपटराव पवार यांच्याकडून आदर्श गाव योजनेसाठी जिथे जिथे तुम्हाला आमची गरज पडेल तिथंच आम्ही तुम्हाला मदत करू ,कधीही हाक द्या अशी ग्वाही दिली. देवडी सारख्या छोट्या गावामध्ये महाराष्ट्राचा कार्यक्रम होत असताना मुंबईपासून ते गडचिरोली पर्यंत सर्व पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित राहिले त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी पत्रकार परिषद सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले. यावेळी महाराष्ट्रभरातून अनेक ज्येष्ठ पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## बीडमध्ये सोमवारी गोरक्षनाथ महाराज भिलारे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील नगर रोड भागातील माऊलीनगर येथील श्रीसंत भगवानबाबा, वै.वामनभाऊ महाराज, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मूर्ती प्राण प्रतिष्ठापना निमीत्त अखंड हरीनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रमाबरोबरच दुपारी २.०० ते ४.०० रामायण, सायंकाळी ५.०० ते सकाळी ६.०० हरिपाठ, रात्री ८.०० ते १०.०० या वेळात हरिकीर्तन कार्यक्रम होत आहेत. सोमवार दि.१५ रोजी रात्री ८.०० ते १०.०० या वेळात रामायणाचार्य ह.भ.प. स्वामी गोरक्षनाथ महाराज भिल्लारे, मच्छिंद्रनाथ संस्थान, यांचे कीर्तन होणार आहे. सप्ताहातील कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पान १ वरून...

### महाराष्ट्रातील सामाजिक

हा प्रश्न आहे. या महाराष्ट्रातील सामाजिक समता संपली आहे. एकमेकांना मारुन सोशल मीडियावर स्टेटस ठेवली जातात, मारहाण करणाऱ्यांना योद्धा म्हटले जाते. त्यांना अटक होत नाही. एकाला शिक्षा होते. परंतु, सारखाच गुन्हा असलेल्या दुसऱ्याला शिक्षा होत नाही. या सगळ्यामुळे महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था उरली आहे की नाही, हा प्रश्न पडतो, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले. यावर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात तात्काळ उत्तर दिले. परंतु, देवेंद्र फडणवीस यांचे हे उत्तर मोजक्या शब्दांत होते. अध्यक्ष महोदय, राज्यात कायदा आहे. कायद्यानेच राज्य चालते कोणी कायदा मोडण्याचा प्रयत्न करत असेल तर यासंदर्भात कडक कारवाई केली जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००

### देशातील अणुऊर्जा क्षेत्र

उद्दिष्टांसाठी महत्त्वाची आहे. अंबानी, अदानी आणि जिंदाल सारखे प्रमुख उद्योगपती या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास इच्छुक आहेत. वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी या कंपन्या अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याची योजना आखत आहेत. विशेषतः डेटा सेंटर आणि एआय पायाभूत सुविधांसाठी ऊर्जेची मागणी वेगाने वाढत आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की खाजगी सहभाग असूनही, सुरक्षा मानके आणि अणुऊर्जा विभागाशी समन्वय सर्वोच्च प्राधान्य राहील. अणुऊर्जा हे एक संवेदनशील क्षेत्र आहे, म्हणून सर्व प्रकल्पांनी कडक सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन केले पाहिजे. हे पाऊल भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत करेल आणि निव्वळ शून्य ध्येयाकडे वाटचाल करेल. खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे गुंतवणूक वाढेल आणि तांत्रिक नवोपक्रमांना चालना मिळेल.

### शक्तिपीठ मार्गाची दिशा

बदलून टाकेल आणि या संदर्भात मागच्या काळामध्ये काही आक्षेप लोकांचे आले होते, विशेषता लोकांचा एक आक्षेप होता तो खरा होता की, आपण जी अलाइनमेंट फॉलो केली होती ती लोकांनी आपल्या लक्षात आणून दिली. सोलापूर पासून आपली अलाइनमेंट ही जो राष्ट्रीय महामार्ग आहे त्याला समांतर जात होती, आणि त्याच्यामुळे ग्रीनफिल्ड महामार्ग का बनवतो कारण यामुळे नवीन एरिया ओपन होतात, ग्रीन फील्ड महामार्गामुळे न जोडले गेलेले लोक त्याला जोडले जातात आणि तिथे विकास होतो. म्हणून जयकुमार

गोरे आणि सर्वांशी आम्ही चर्चा केली आणि याची सोलापूर पासून एक वेगळी नवीन अलाइनमेंट आम्ही तयार केली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, वेगळी नवीन अलाइनमेंट ही चंदगड पासून सोलापूर, सांगलीपासून जाते, आमचे जयंतराव पहिल्यांदा सुटून गेले होते, शक्तीपीठ मार्गातून आता त्यांच्याजवळ महामार्गाने पोहोचता येईल, आणि मी तुम्हाला दाव्याने सांगतो की जयंतरावच मला पत्र देतील की हा महामार्ग करा, याचा मोठा फायदा त्यांच्या मतदारसंघाला होणार आहे, पंढरपूर जवळून तो मार्ग जाईल आधी जॉईंट मेजरमेंट केले आहे, त्याचे संपादन आपण चालू केलेले आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात बोलताना दिली.

शक्तिपीठ प्रकल्प हा धार्मिक पर्यटन आणि राज्यातील संपर्क सुविधा वाढविणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. नागपूर ते गोवा हा मार्ग अनेक जिल्ह्यांमधून जाणार असल्याने पर्यटन, व्यापारी देवाणघेवाण आणि स्थानिक रोजगार निर्मितीसाठी तो लाभदायी ठरणार आहे. मात्र, धाराशीवमध्ये काही ठिकाणी स्थानिक पातळीवर विरोध दिसून आला होता. सरकार कोणावरही अन्याय करणार नाही. त्यामुळे शक्तिपीठ मार्गाचे नवे सरेखन सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांमधून नेण्यात येईल, ज्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांचा शक्तिपीठाशी थेट संपर्क प्रस्थापित होईल, असे फडणवीसांनी सांगितले.

### ओबीसी आंदोलक

करण्यात यावी, अशी मागणी ओबीसी आंदोलक व ओबीसी समाजाने केली आहे. ओबीसी आंदोलक मंगेश ससाणे यांच्या गाडीवर शनिवारी रात्री काही अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. दोन महिन्यांपूर्वी पवन करवर याच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाची माहिती घेण्याकरता ॲड. ससाणे हे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले होते. त्यानंतर माजलगाववरून धारूरकडे जात असताना विसावा हॉटेलच्या पुढे दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी ससाणे यांची गाडी थांबवून दगडफेक केली. ॲड. ससाणे यांनी तात्काळ धारूर पोलीस ठाणे गाठत या हल्ल्याबाबतची माहिती धारूर पोलिसांना दिली. त्यावरून धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरु आहे. यापूर्वी माजलगाव तालुक्यामध्ये ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांचे सहकारी असलेले पवन करवर यांच्यावर हल्ला झाला होता. त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. जीवघेणा हल्ला होऊनही पोलीस प्रशासन याची गंभीर दखल घेत नसल्याने ओबीसी नेते ॲड. मंगेश ससाने यांनी माजलगाव पोलीस ठाण्यामध्ये जाऊन या प्रकरणाची सखोल माहिती घेतली. ही माहिती घेतल्यानंतर परत माजलगावहून धारूर मार्गे जात असताना त्यांच्या वाहनावर अज्ञात हल्लेखोरांनी दगडफेक करत हल्ल्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे ओबीसी समाजामध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे.

### १ जुलैपर्यंत कर्जमाफी योजनेची

केली. कापूस उत्पादकता पकडताना पहिले तीन जिल्हे निवडावेत. त्या जिल्ह्यांची सर्वाधिक उत्पादक ही सरकारी उत्पादकता पकडावी. यासंदर्भात सरकारने १,२७७ किलो प्रतिहेक्टर ऐवजी २,३६८ किलो प्रतिहेक्टरचा निर्णय घेतला. यामुळे कुठल्याही शेतकऱ्याचा कापूस आता परत जाणार नाही, अशी व्यवस्था आम्ही केली आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. राज्यातील विजेचे दर पुढील पाच वर्षांत वाढणार नाहीत तर ते दरवर्षी २ टक्क्यांनी कमी होतील, अशी घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत केली. विजेचे दरही कमी करण्यात आले आहेत. पुढच्या पाच वर्षात दरवर्षी हे दर २ टक्क्यांनी कमी होतील. पुढील सहा महिन्यात १ लाख मेगावॅट पंप स्टोरेजचे करार केले जातील. गुजरात राजस्थानने ५० हजार मेगावॅटचे सोलर केले आहेत. तसे १ लाख मेगावॅटचे सोलर आम्ही करु, असेही त्यांनी सांगितले.

### सामान्य कुटुंबांतील व्यक्तींना

अनेक लोक आयुष्यात यशस्वी होतात कारण त्यांना मजबूत पार्श्वभूमी आणि पाठिंबा मिळतो. परंतु असे बरेच लोक आहेत ज्यांना असा पाठिंबा मिळत नाही. तरीही त्यांच्यात समाजासाठी काम करण्याची क्षमता आणि दूरदृष्टी असते. त्यांना संधी आणि प्रोत्साहनाची गरज आहे. चव्हाण यांच्या प्रवासाची आठवण करून देताना पवार म्हणाले, चव्हाण हे अत्यंत सामान्य कुटुंबातून आले होते. तरीही ते केवळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीच झाले नाहीत, तर त्यांनी देशाचे संरक्षण मंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणूनही काम केले. यावरून हे दिसून येते की क्षमता ही काही मोजक्या लोकांची मक्तेदारी नाही. ती सामान्य लोकांमध्येही असते. फेलोशिप कार्यक्रमाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रातील अशा व्यक्तींना ओळखून त्यांना विकासासाठी व्यासपीठ दिल्याबद्दल त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी पवार यांनी फेलोशिप विजेत्यांचेही अभिनंदन केले. पुढील वर्षापासून शरद पवार इन्स्पायर फेलोशिप केवळ महिलांसाठी सुरू केली जाईल, असे राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे म्हटले आहे. यशवंतराव चव्हाण केंद्राने पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्यानिमित्त ही फेलोशिप सुरू केली होती आणि आता ती पाचव्या वर्षात पदार्पण करत आहे. ही फेलोशिप कृषी, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यांसारख्या क्षेत्रांमध्ये रुची असलेल्या महिलांवर लक्ष केंद्रित करेल.

### निवडणूक आयोग

महत्वाची गोष्ट मानली जाते; पण मोहन भागवत यांचे विधान ऐका. जग सत्याकडे नाही तर सत्तेकडे पाहते. ज्याच्याकडे सत्ता आहे तो सर्वात महत्वाचा मानला जातो. ही मोहन भागवतांची विचारसरणी आहे, ही आरएसएसची विचारसरणी आहे. आमची विचारसरणी, भारताची, हिंदू धर्माची आणि जगातील प्रत्येक धर्माची, सत्य ही सर्वात महत्वाची गोष्ट म्हणते; पण मोहन भागवत म्हणतात की, सत्याला काही अर्थ नाही; शक्ती हीच महत्त्वाची आहे. मी तुम्हाला हमी देतो की सत्य घेऊन आणि त्याच्या मागे उभे राहून आपण नरेंद्र मोदी, अमित शहा आणि आरएसएसच्या सरकारला सत्तेवरून काढून टाकू. ते पुढे म्हणाले, निवडणूक आयोग भाजप सरकारसोबत संगनमताने काम करत आहे भाजपकडे सत्ता आहे, ते मते चोरतात, निवडणुकीदरम्यान ते १० हजार रुपये देतात, त्यांचे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी आहेत. निवडणूक आयोग भाजप सरकारसोबत संगनमताने काम करत आहे. पंतप्रधान मोदींनी त्यांच्यासाठी कायदा बदलला. आता नवीन कायद्यानुसार निवडणूक आयुक्त काहीही करत असले तरी त्यांच्यावर खटला चालवता येणार नाही. आम्ही हा कायदा बदलू. आम्ही सत्यासाठी लढत आहोत आणि तुम्ही खोट्याच्या बाजूने उभे आहात, असेही राहुल गांधी म्हणाले.

### लग्न लावण्यासाठी १०

कुटुंबासह एकूण सात जणांविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात फसवणूक, धमकी आणि अपहार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभय अरुणराव खोडसकर (वय ३९, रा. सारडा संकुल, बीड) यांनी तक्रार दिली आहे. लग्न जमत नसल्यामुळे ते मानसिक तणावात होते. याच परिस्थितीचा फायदा घेत, रामकृष्ण उपाध्ये, रजनी उपाध्ये, उदय उपाध्ये, पल्लवी उपाध्ये आणि बुलढाणा जिल्ह्यातील उंदरी येथील प्रकाश व संगीता मैदाने यांनी अभय यांना त्यांच्या गावातील मुलगी कोमल हिच्याशी लग्न जुळवून देण्याचे

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.१५ डिसेंबर २०२५




## शंकरराव फपाळ यांचे निधन

माजलगाव : येथील शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांचे वडील शंकरराव गणपतराव फपाळ यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने शनिवार दिनांक १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ७:०० वाजता दुःखद निधन झाले. ते अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात ४ मुले अंगद,त्रिंबक, रमेश,अंकुश व एक मुलगी पुष्पा प्रकाशराव नखाते आवरगाव सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभूमी माजलगाव येथे रविवार दिनांक १४ डिसेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

# १४० गावच्या न्यायासाठी न्यायाचार्य उभे

## लोकलढा आंदोलकांनी घेतली महंत नामदेव शास्त्रींची भेट

बीड। प्रतिनिधी

बीडसह शिरूर, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील १४० पेक्षा अधिक गावच्या ग्रामस्थांनी एकत्र येत जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचे समन्वयक राहुल लोंढे, दिनेश गुळवे व शिष्टमंडळाने आज रविवारी श्री क्षेत्र भगवानगडचे महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांची भेट घेत वंचित असलेल्या दुष्काळी भागाला जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, यासाठी मदत करण्याची भावना व्यक्त केली. या मागणीसाठी आपण सहकार्य करण्याचा विश्वास यावेळी महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी व्यक्त केला.

यावेळी गहिनीनाथ पालवे, बाळासाहेब सानप, प्रभाकर बांगर, गिरधारी सांगळे, विष्णू बांगर, समन्वयक दिनेश गुळवे, राहुल लोंढे, संतोष कारंडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने



उपस्थित होते. शिरूर ते माजलगाव पर्यंत सिंदफणा काठचे व महामार्ग लगतच्या शेतकर्यांना सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागते. या भागाचा दुष्काळ दूर व्हावा यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी लिफ्ट करून सिंदफणा नदी पात्रात सोडावे व महामार्ग लगत उपकालवा करावा यासाठी दोन वर्षांपासून १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनातील शेतकऱ्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, विद्यमान जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार रजनीताई पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधींची भेट घेत, जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे ही मागणी केली. या मागणीच्या अनुषंगाने सर्वे करावा अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत. हा सर्वे तात्काळ व्हावा, यासाठी लोकलढा आंदोलनाच्या शिष्टमंडळाने आज रविवारी गेवराई तालुक्यातील उक्कडपिंपरी येथे महंत नामदेव शास्त्री महाराज यांची भेट घेतली. या मागणीसाठी १४० गावच्या ग्रामपंचायतने ठराव दिले आहेत, हे ठराव व इतर कागदपत्रे याची माहितीही यावेळी समन्वयक राहुल लोंढे यांनी महंत नामदेव शास्त्री महाराज यांना दिली. यावेळी महंत नामदेव शास्त्री महाराज म्हणाले, की लाखो शेतकरी कुटुंबाच्या कल्याणाची ही मागणी आहे, यासाठी आपण सर्वोतोपरी पाठीशी असल्याचे सांगून यासाठी आपणही पत्र देणार असल्याचे ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांच्या नावे देणार पत्र

नदीजोड प्रकल्पामध्ये गोदावरी–सिंदफणा नदीजोड योजनेचा समावेश करावा व जायकवाडीचे पाणी सिंदफणा पट्ट्यातील वंचित शेतकर्यांना द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात येणार आहे. लोकलढा आंदोलनाचे शिष्टमंडळ लवरच श्री क्षेत्र भगवानगड येथे जाणार आहे. या शिष्टमंडळाकडे हे पत्र देणार असून आपणही या संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांना बोलू, असेही यावेळी महंत नामदेव शास्त्री महाराज म्हणाले.

## वाचन, लेखनाला जगात पर्याय नाही – डॉ. रंजन गर्गे



माजलगाव। प्रतिनिधी

पुस्तकांचे वाचन केल्यानंतर आपण मनन करतो. वाचन, लेखनाला जगात पर्याय नाही,असे प्रतिपादन प्रसिद्ध शास्त्रज्ञ व विज्ञान लेखक डॉ.रंजन गर्गे यांनी केले. येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात शनिवार दि.१३ डिसेंबर रोजी आयोजित मुक्त संवाद कार्यक्रमात डॉ. शरंजन गर्गे बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार उमेश मोगरेकर होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. योगिता होके पाटील,ज्ञानेश्वर उद्देवाल ,प्रा.डॉ. विकास जाधव, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. रंजन गर्गे म्हणाले की, आपण हस्तलिखिते जतन केली पाहिजे. यातून संस्कार होत असतो. आपला व्यक्तिमत्व विकास नकळत होत असतो. वर्तमानपत्रातील लेखनामुळे माझ्यामध्ये लेखकाचे बीजारोपण झाले. सोशिकता असल्याशिवाय आपण गिर्यारोहण करू शकत नाही. यावेळी त्यांनी त्यांचे गिर्यारोहणातील चित्तथरारक अनुभव कथन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. योगिता होके पाटील यांनी केले. अध्यक्षीय समारोप उमेश मोगरेकर यांनी केला. सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले.यावेळी माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील,सुरेंद्र जोशी,आप्पासाहेब होके,विष्णू गडकर, अनंत शेजुळ,अनंत राठोड,सय्यद गयास,सत्यप्रिया होके पाटील, फरजाना पठाण, पंकज कळसकर, तुळशीराम साळवे, ज्ञानेश्वर पवार,शेख शहाणूर,मिलिंद देशपांडे,प्रथमेश लांडगे,स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, टाकणखार मॅडम, मंजुषा गाजरे, कैलास कदम रविकुमार साळवे, दत्ता पांडे,दिनकर काळे यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



## दिंद्रुड येथे डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते शासकीय सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ

दिंद्रुड । प्रतिनिधी

ायुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते दिंद्रुड येथे सोयाबीन हमीभाव खरेदी सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना या केंद्रावर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने शासनाने निर्धारित केलेल्या दरामध्ये सोयाबीन, उडीद, मूग विक्री करता येईल. राज्याचे संवेदनशील, अभ्यासू व शेतकऱ्यांचे कैवारी असलेल्या पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांनी हे केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल डॉ.शेटे यांनी त्यांचे आभार मानले. तसेच मतदार संघात आणखी काही खरेदी केंद्र सुरू करण्याची आपण मंत्री महोदयाकडे मागणी केली असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, देवदूत प्रतिष्ठान चे अध्यक्ष बंडू खांडेकर, शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते सुभाष मायकर, प्रतिष्ठित व्यापारी नानासाहेब जैन, वैजनाथ काशीद ,कैलास ठोंबरे, प्रदीप ठोंबरे, अतुल चव्हाण, सतीश मायकर , नित्रुडचे प्रगतशील शेतकरी ड. सतीश बोरचाटे आदी मान्यवर उपस्थित होते. वजनकाट्यावर प्रत्यक्ष मोजणी करून खादीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शेतकऱ्याचा सत्कार करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते पावती देण्यात आली. यावेळी बोलताना डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, सोयाबीन, मूग व उडीद विक्रीसाठी हमीभाव खरेदी सेवा केंद्र सुरू करावे अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती. अनेकांनी प्रत्यक्ष भेटून तर काहींनी फोनवरून माझ्याकडे आग्रह धरला होता. या अनुषंगाने आपण मुंबई येथे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांना प्रत्यक्ष भेटून माजलगाव मतदार संघामध्ये सोयाबीन हमीभाव खरेदी सेवा केंद्र सुरू करावे अशी विनंती त्यांना केली. मंत्री महोदयांनी ताबडतोब दिंद्रुड येथील श्री पांडुरंग ॲग्रो फॉर्म प्रोड्युसर कंपनीला शासकीय हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास परवानगी दिली आहे. शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपले सोयाबीन, मूग व उडीद या ठिकाणी हमीभावाने विक्री करावेत.त्याचबरोबर मतदारसंघात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आणखी सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत आपण हिवाळी अधिवेशन दरम्यान नागपूर येथे परत मंत्री महोदयांनी भेट घेऊन आणखी काही सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची त्यांच्याकडे विनंती केली. याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल असा शब्द त्यांनी दिला आहे. त्यामुळे आणखी खरेदी केंद्र सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचेही डॉ.शेटे म्हणाले. सूत्रसंचालन किशोर ठोंबरे यांनी तर आभार प्रताप काशिद यांनी मानले.

## रमेश गाडे यांना बीड जिल्हा शाखारत्न म्हणुन बहुमान

आष्टी। प्रतिनिधी

भारतीय आयुर्विमा महामंडळ बीड शाखेच्या कार्यक्षेत्रात विमा क्षेत्रात सातत्यपूर्ण, प्रामाणिक व विश्वासार्ह सेवा बजावल्याबद्दल आष्टी विमा प्रतिनिधी रमेश भोगाडे यांना 'बीड शाखा रत्न' या मानाच्या सन्मानाने गौरविण्यात आले. विमा सेवा, ग्राहक समाधान आणि विमा जनजागृतीच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन एलआयसी बीड शाखेच्या वतीने हा सन्मान प्रदान करण्यात आला.

एलआयसी बीड शाखेत विमा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या रमेश भोगाडे यांनी विमा प्रचार, नव्या विमाधारकांची नोंदणी, पॉलिसी सेवा, विमा दावे निकाली काढणे तसेच विमा विषयक मार्गदर्शन या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य असल्याने त्यांचे या कामांमध्ये



योगदान आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे असंख्य विमा ग्राहकांना वेळेवर, पारदर्शक व विश्वासार्ह सेवा मिळाली असून, ग्राहकांचा एलआयसीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. विमा ग्राहकांचे समाधान आणि विश्वास हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख ठरत आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आयोजित सन्मान समारंभात रमेश भोगाडे यांना 'बीड शाखा रत्न' सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. हा सन्मान उदयजी सुदुंब्रेकर, विभागीय व्यवस्थापक यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रम नितीन मगर, शाखाधिकारी, गेवराई, गणेश औटी, शाखाधिकारी, संदीप जोशी, वरिष्ठ शाखाधिकारी तसेच विकास अधिकारी शिवाजी पवार यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला. हा पुरस्कार रमेश भोगाडे यांनी पत्नी आरती भोगाडे व भाऊ योगेश भोगाडे यांच्यासह स्वीकारला. कुटुंबीयांचा पाठिंबा, सहकारी विमा प्रतिनिधींचे सहकार्य तसेच विमा ग्राहकांचा विश्वास यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. हा सन्मान म्हणजे आपल्या कार्याची पावती असून, भविष्यातही विमा ग्राहकांना अधिक दर्जेदार, तत्पर व प्रामाणिक सेवा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. रमेश भोगाडे यांच्या या यशाबद्दल एलआयसी बीड शाखेतील अधिकारी, कर्मचारी, सहकारी विमा प्रतिनिधी, विमा ग्राहक तसेच मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा होत आहे. आपल्या जिद्द चिकाटी व विश्वासहारतेच्या स्वभावावर रमेश घोगडे यांनी कमी कालावधीमध्ये एलआयसी मध्ये उत्कृष्ट काम केले आहे.

## फुलसांगवी येथे अतुल महाराज शास्त्री यांचे कीर्तन

फुलसांगवी। प्रतिनिधी

येथील रहिवासी असलेले कै. किसनराव त्रिंबक खेडकर (नाना) यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त मौजे फुलसांगवी येथे हभप. महंत अतुल महाराज शास्त्री यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा फुलसांगवी सह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन खेडकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथील रहिवासी तथा फुलसांगवी -हाजीपूर - मार्कडवाडी ग्रामपंचायतचे तत्कालीन पहिले सरपंच कै. किसनराव त्रिंबक खेडकर यांचे वर्षभरापूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले होते. त्यांच्या प्रथम वार्षिक पुण्यस्मरणाच्या निमित्ताने मंगळवार दिनांक १६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये हभप. महंत अतुल महाराज शास्त्री ( श्री संत भगवान बाबा संस्थान तागडगाव ) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तनाच्या कार्यक्रमासाठी, मित्रपरिवार, स्नेही, नातलग, गावकरी मंडळी सह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व त्याचबरोबर दुपारी १ ते ७ या वेळेमध्ये स्नेहभोजनाचा लाभ घ्यावा असे अवाहन दिलीप किसनराव खेडकर, अर्जुन किसनराव खेडकर (बप्पा) रवींद्र किसनराव खेडकर यांच्यासह समस्त खेडकर परिवारांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अजित पवारांनी संशोधकांची माफी मागावी–सचिन मेघडंबर

पाटोदा । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीएचडी शिक्षणासंदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर वंचित बहुजन आघाडीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''पीएचडी करून काय दिवे लावणार?'' तसेच कॉलरशिपसाठी एकाच घरात पाच–पाच जण पीएचडी करतात, असे विधान करून अजित पवार यांनी उच्च शिक्षण व संशोधन क्षेत्राचा अपमान केला असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते सचिन मेघडबर यांनी केला आहे. या संदर्भात सचिन मेघडबर यांनी प्रसिद्धी पत्रक जाहीर करून राज्य सरकारच्या भूमिकेवर कडाडून टीका केली आहे. पीएचडी व संशोधन हे देशाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे संशोधन करणाऱ्या तरुणांच्या मनोबलावर विपरीत परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले.

कॉलरशिप योजना या गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांसाठी असतात. जर या योजनांमध्ये गैरप्रकार होत असतील तर त्यावर ठोस कारवाई करणे ही सरकारची जबाबदारी आहे; मात्र त्याच्या नावाखाली संपूर्ण पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोषी ठरवणे चुकीचे व अन्यायकारक असल्याचे मेघडबर यांनी स्पष्ट केले. शिक्षण व्यवस्था बळकट करण्याऐवजी शिक्षित तरुणांची थट्टा करणे हे राज्याच्या भविष्याच्या दृष्टीने घातक असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या वक्तव्याबाबत तात्काळ जाहीर भूमिका स्पष्ट करावी तसेच संशोधक व पीएचडी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. या प्रसिद्धी पत्रकानंतर राज्यातील राजकीय व शैक्षणिक वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून या वक्तव्यावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे





माजलगाव:– लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव ता.धारूर जि.बीड, येथील लिगल विभाग प्रमुख अशोक पाटील हे दिं.१३ डिसेंबर शनिवारी रोजी नियतवयोमानानुसार सेवेतुन सेवानिव्रत झाले.प्रसंगी शुभेच्छा देताना कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर, सचिव सुरेश लगड,मार्केटिंग मॅनैजर बागवान,आय.टी.प्रमुख संजय मोटेगावकर,बळीराम निपटेभारतराव शेळके,बळीराम नाईकवाडे,दिगाबंर विर आदि कर्मचारी

# लिंबागणेश येथे अतिवृष्टी अनुदानाच्या ई–केवायसीचा सखोल आढावा

## सेवा केंद्र चालकांना प्रलंबित ई–केवायसी तातडीने पूर्ण करण्याच्या सक्त सूचना

लिंबागणेश। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात काही महिन्यांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर पीक नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना शासनामार्फत आर्थिक मदत म्हणून अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार असून, यासाठी ई–केवायसी प्रक्रिया अनिवार्य आहे. मात्र अद्याप अनेक शेतकऱ्यांची ई–केवायसी प्रलंबित असल्याने त्यांचे अनुदान शासनाकडेच अडकून पडले आहे. या पार्श्वभूमीवर दि. १४ डिसेंबर रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी प्रत्यक्ष गावात भेट देत अतिवृष्टी अनुदानाच्या ई–केवायसी प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला.



यावेळी तलाठी गणपत पोतदार, राजेंद्र शेलकर, तलाठी अक्षय शिंदे, तलाठी नारायण दराडे, महसूल सेवक, पत्रकार हरिओम क्षीरसागर तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे उपस्थित होते. मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी लिंबागणेश येथील सर्व शासकीय व खासगी सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन केंद्र चालकांशी संवाद साधला. अनेक शेतकऱ्यांची ई–केवायसी अद्याप प्रलंबित असल्याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांचे अनुदान वेळेत मिळावे, यासाठी प्रलंबित सर्व ई–केवायसी तातडीने पूर्ण करून शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्याच्या सक्त सूचना त्यांनी सेवा केंद्र चालकांना दिल्या. एका शेतकऱ्याचेही अनुदान ई–केवायसीअभावी रखडता कामा नये. केंद्र चालकांनी कामात तातडीने गती आणावी, अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल,'' असा स्पष्ट इशाराही यावेळी मंडळ अधिकारी उज्वला राऊत यांनी दिला. अतिवृष्टीमुळे पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी हे अनुदान अत्यंत महत्त्वाचे असून अनेक शेतकरी या मदतीवर पुढील हंगामाची तयारी अवलंबून असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. मात्र ई–केवायसीसारख्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब यावेळी समोर आली. या प्रशासनिक हालचालीमुळे लिंबागणेश परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच प्रलंबित ई–केवायसी पूर्ण होऊन अनुदान थेट खात्यावर जमा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त 'संविधान वाचन पंधरवाडा'चे आयोजन – कास्ट्राईब

माजलगाव। प्रतिनिधी

महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ माजलगावच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका,पंचायत समिती समोर येथे भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त लाऊड स्पीकर वरून दि.१४ डिसेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत रोज सायंकाळी ७:०० वाजता 'संविधान वाचन पंधरवाडा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाबाबत जनजागृती वाढवणे, संविधानिक मूल्ये समाजात रुजवणे आणि लोकशाहीची जाणीव बळकट करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या संविधान वाचन पंधरवाडा कार्यक्रमाचे उदघाटक राहुल सूर्यतळ,पोलीस निरीक्षक माजलगाव.अध्यक्ष भारत टाकणखार जिल्हा संघटन प्रमुख कास्ट्राईब तर प्रमुख पाहुणे सूर्यकांत जोगदंड,बाळासाहेब सोनवणे हे असणार आहेत.हा संपूर्ण कार्यक्रम नूरखा पठाण लिखित ''आपले संविधान : राज्यपद्धती नव्हे तर जीवनपद्धती'' या पुस्तकातील अनुच्छेद १ ते ५१ पर्यंतचे वाचन करण्यावर आधारित आहे.या अनुच्छेदाचे वाचन विविध मान्यवर वक्त्यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. संविधानातील मूलभूत अधिकार,राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वे व नागरिकांची कर्तव्ये यांचे सखोल वाचन व चिंतन या उपक्रमातून घडणार आहे. यासोबतच संविधानाच्या मूल्यांवर आधारित कवी संमेलन महाराष्ट्राचे प्रख्यात कवी प्रभाकर साडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले असून यामध्ये परिसरातील अनेक कवी,कवयित्री सहभागी होणार असून ते आपल्या कवितांतून स्वातंत्र्य, समता,बंधुता, न्याय आणि लोकशाही या संविधानिक संकल्पनांचे प्रभावी सादरीकरण करणार आहेत. संविधानाला केवळ कायद्याचा ग्रंथ न मानता जीवनपद्धती म्हणून स्वीकार करण्याचा संदेश देणारा हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम असून या पंधरवड्यात जास्तीत जास्त या कर्मचारी,विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि संविधानप्रेमी नागरिकांनी सहभागी संविधानिक मूल्यांचे संवर्धन करावे असे आवाहन निमंत्रक तथा कास्ट्राईब तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# गोवंशासाठी शेतकऱ्यांना अनुदान देणे शक्य नाही

## भाकड जनावरांच्या प्रश्नावरुन सरकारचे उत्तर



नागपूर : भाकड जनावरांचा आणि गोरक्षणाच्या नावाखाली शेतकऱ्यांना त्रास देण्याऱ्या टोळ्यांचा मुद्दा विधानसभेत चांगलाच गाजला. भाकड जनावरे गोरक्षक शेतकऱ्यांना विकू देत नाही. त्यामुळे भाकड गोवंशासाठी शेतकऱ्यांना थेट मदत करा. तसेच गोरक्षणाच्या नावाखाली काही बोगस टोळ्या शेतकऱ्यांकडून पैसे वसूल करत आहेत त्यावरही उपाययोजना करा अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. यावर अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना अनुदान देणे शक्य नाही असे सांगितले तर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी बोगस टोळ्यांवर कारवाईचा इशारा दिला.

गोवंश हत्याबंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांना भोकड जनावरांची विक्री करणे कठीण झाले आहे. गोरक्षणाच्या नावाखाली काही टोळ्या जनावरांची वाहतूक करताना अडथळे आणून शेतकऱ्यांकडून पैशांची वसुली करतात, अशा तक्रारी राज्यभरातून शेतकरी करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अशी भाकड जनावरे सांभाळावी लागत आहेत, हा मुद्दा विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडला. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी भाकड जनावरांबाबत सरकारची भूमिका अत्यंत संवेदनशील असल्याचे सांगितले. कायद्याचा गैरफायदा उचलणाऱ्या ज्या टोळ्या आहेत. त्यांच्याबाबत आम्ही संवेदनशील नाही. आम्ही त्यांच्यावर वेळोवेळी कारवाया केल्या आहेत. शेतकरी संघटनेचे रघुनाथदादा माझ्याकडे आले होते. शेतकरी स्वतःच्या जनावराची वाहतूक करत असेल तर अशा टोळ्यांना पाठीशी घातले जाणार नाही, असे मुंडे यांनी सांगितले. भाकड जनावरे पाळणे शेतकऱ्याला कठीण होतं. आमचे एकमेव राज्य आहे जे गोरक्षणासाठी मोठे अनुदान देत आहे. शेतकऱ्यांना कसे सहकार्य करायचे; त्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत, असे मुंडे यांनी नमूद केले. त्यांनी यावेळी निवृत्त न्यायमूर्तींचा समावेश असलेल्या एका समितीच्या अभ्यासाचा संदर्भ दिला. केवळ दूध देणारे जनावर उपयोगाचे असते असे नाही. गोवंशाचे शेण, गोमुत्र याचा शेतीवर सकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे त्यांना वाचवणे, पालनपोषण करणे जरुरी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विजय वडेट्टीवार म्हणाले की, भाकड जनावरांसाठी काय उपाययोजना आहेत. एक तर ते विकू दिले जात नाही. त्यासाठी भाकड जनावारांसाठी निधी वाढवून घ्या. या जनावरांची किंमत ठरवा. त्याचा मोबदला शेतकऱ्यांना द्या म्हणजे प्रश्न सुटेल. गोहत्येसाठी हे जनावरे जातात, हे थांबवता येईल. एका १७ वर्षांच्या पोरानं आत्महत्या केली. त्याची स्वतःची जनावरे आहेत. त्याला पकडून मारहाण केली. आण त्याची बदनामी केली. हे खूप गंभीर आहे. गोरक्षणामध्ये त्या जनावाराला ठेवल्यानंतर त्याला योग्य मोबादला मिळेल. त्याबाबतचा निर्णय घ्या, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार, यांनी महाराष्ट्र गोवंशहत्या बंदी कायद्याच सुधारणा करण्याचे गरज असल्याचे नमूद केले. भाकड गायी, देशी गोवंश यांच्यासाठी शासकीय जागेवर कुरण विकसित करण्याचा कालबद्द कार्यक्रम करता येऊ शकतो. १९६१ मध्ये जनावरांची संख्या किती होती? आज किती आहे? या आधावर चाऱ्याचे नियोजन करण्यासाठी कार्यवाही करणार आहे का? असे सवाल त्यांनी केले. गोवंश रक्षणासाठी २२२ कोटी रक्कम असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्रीगोंदा येथील भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनीही यावरून काही प्रश्न उपस्थित केले. देशी गायींसोबत बैलांचेही हाल होतात. ती पकडली जातात, त्यांना पांझरपोळमध्ये नेले जाते. पण तिथे अधिक क्षमता नसल्याने तेथे ती जनावरे मरण पावतात. हे दुर्दैवी आहे. यावर मार्ग काढायला हवा, असे पाचपुते म्हणाले. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही उत्तर दिले. भाकड जनावरांना सांभाळण्यासाठी शेतकऱ्यांना मदत देणे शक्य नाही. राज्यात १ कोटी शेतकरी आहेत. शेतकरी विविध प्रकारची जनावरे सांभाळतात. पण अनुदान फक्त गोवंशाला दिले जाते. शेतकऱ्यांकडे किती गोवंश आहे? हे कसे ठरवणार? तसेच राज्याची तिजोरी ओसंडून वाहत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान देणे शक्य नाही केवळ गोशाळांना अनुदान देणे शक्य आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.

## मक्याच्या संकरीत जाती देतात हेक्टरी १०० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन!

भारतीय कृषी संशोधन संस्थेने मक्याच्या अशा दोन जाती विकसित केल्या आहेत ज्या बंपर उत्पादन देतात, आणि शेतकऱ्यांना यातून चांगले उत्पन्न मिळेल. अलीकडच्या काळात, सीव्हीआरसी (केंद्रीय विविधता प्रकाशन समिती) मार्फत आयाआयएमआर कडून मक्याच्या २५ सिंगल क्रॉस हायब्रीड विकसित आणि प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. मक्याचे हे नवीन वाण आहे डीएमआरएच १३०८ आणि डीएमआरएच १३०१. मक्याच्या या जातींनी राष्ट्रीय स्तरावर उत्पादकता वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.आयआयएमआर इथेनॉल उत्पादन वाढवण्यासाठी मका उत्पादन वाढविणाऱ्या प्रकल्पावर काम करत आहे. शेतकऱ्यांनी जास्त उत्पादन देणाऱ्या मक्याच्या वाणांची लागवड करावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मक्याच्या माध्यमातून शेतकरी ऊर्जा उत्पादक बनले पाहिजे.

संकरित मक्याचे वाण : डीएमआरएच १३०८ – रब्बी हंगामात लागवडीसाठी संकरित डीएमआरएच १३०८ ची शिफारस करण्यात आली आहे. १३०-१५० दिवसांत पक्व होणारा हा उच्च उत्पन्न देणारा रब्बी संकरित मका आहे, ज्यामध्ये दाण्यांचा रंग आकर्षक पिवळा आहे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक आहे. गेल्या चार वर्षात, १३०८ मक्याच्या वाणाने मोठा वाटा उचलला आहे.

डीएमआरएच १३०१ – ही जात पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमध्ये रब्बी हंगामाच्या लागवडीसाठी शिफारस करण्यात आली होती. हा आणखी एक मध्यम कालावधीचा संकरित मका आहे. आकर्षक पिवळे दाणे, करपा आणि खोड कुजव्या रोगास मध्यम प्रतिकारक असलेली ही उच्च उत्पन्न देणारी जात आहे. हा संकरीत वाण शेतकऱ्यांना ६.५ ते १०.५ टन/हेक्टर उत्पादन देते. म्हणजेच, योग्य व्यवस्थापन केल्यास या जातीपासूनही १०० क्विंटल प्रति हेक्टरपेक्षा जास्त उत्पादन मिळू शकते.

## शतावरी लागवड पद्धत



शतावरी ही वनस्पती भारतात सुमारे दोन हजार वर्षांपासून परिचित आहे. शतावरीच्या सेवनाने माणसाची कार्यशक्ती शतगुणित होते. ही वनस्पती औषधीदृष्ट्या महत्वाची आहे. अनेक जातींपैकी ॲस्परॅगस रॅसिमोसस ही औषधीदृष्ट्र्या अतिशय महत्वाची वनस्पती आहे. पारंपरिक पद्धत बदलून नवीन पद्धत किंवा पिकांना वाव देण्याच्या दृष्टीनेही शतावरीची लागवड फायदेशीर आहे. शतावरीच्या वंशातील ३ पेक्षा जास्त जातींची नोंद जगभरात असली, तरी आपल्या देशात फक्त १७ जातींची नोंद आहे. त्यातील फत नऊ जाती पाहावयास मिळतात. यापैकी योग्य जातीची लागवड केल्यास औषधासाठी चांगली शतावरी उपलब्ध होईल.

जमीन व हवामान : चांगला निचरा होणारी, हलकी, मध्यम, रेताड, जमीन लागवडीस निवडावी. ही वनस्पती उष्ण, तसेच समशीतोष्ण हवामानात चांगली वाढते. प्रतिकूल हवामानात, सुसावस्थेत राहणारी ही वनस्पती अनुकूल हवामान मिळताच पुन्हा फुटू लागते.

पूर्वमशागत : जमिनीची नांगरट करून, कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. प्रति हेक्टरी ४० ते ६० गाड्या शेणखत घालावे. त्यानंतर पाच फूट अंतराने एक फूट खोल व एक फूट रुंद असे चर खोदावेत. चरातील माती काढून निम्म्या मातीत शेणखत मिसळून ती त्याच चरात निम्म्याने भरावी व उरलेली माती रोपे भरताना वापरावी. साधारण ७५ ते ९० सेंमी. अंतराच्या स-या/पाट पाडावेत. हे काम मे महिन्यात करावे.

बियाणे : शतावरीची लागवड बिया टोकून किंवा गड्याच्या फुटव्यापासून प्रतीनुसार त्यांची किंमत प्रति किलो दीड ते तीन हजार रुपये आहे.

रोपांची लागवड : सुरुवातीला उन्हाळ्यात तीन-चार वेळा पाऊस झाल्यानंतर पावसाळ्याच्या सुरुवातीस तयार केलेल्या जमिनीत ६० ६० सेंमी अंतरावर साधारण १० ते १५ सेंमी उंच फूट आलेली रोपे लावावीत. पहिले ३-४ दिवस हलके पाणी द्यावे. त्यानंतर एक दिवसाआड दोन वेळा पाणी द्यावे. नंतर गरजेप्रमाणे ८-१ दिवसांच्या अंतराने पाणी देणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात झाडांचे संरक्षण करण्यासाठी, वेलीच्या बुध्याभोवती चर किंवा खड्ड्यांवर पालापाचोळा किंवा गवत टाकून आच्छादन करावे. त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होईल.

खते : जमिनीच्या प्रकारानुसार व मातीतील खतांच्या प्रमाणानुसार हेक्टरी ४५ किलो नत्र २-३ वेळा विभागून आणि २० किलो स्फुरद व १५ किलो पालाश टाकावे. लागवड करण्याअगोदर शेतातील मातीचे परीक्षण करून त्या आधारावर खतांची मात्रा ठरवावी. चांगल्या व निकोप वाढीसाठी खते योग्य प्रमाणात द्यावीत. अतिरेक टाळावा.

आंतरमशागत : लागवडीनंतर वेलीच्या बुध्याजवळील तण काढावे. वेलीच्या चांगल्या वाढीसाठी, त्यांना काठ्यांचा आधार द्यावा. ते शक्य नसल्यास टोमॅटोला तारा/काथ्या बांधतो त्याप्रमाणे बांधून त्यावर वेली चढवाव्यात.

काढणी व उत्पादन : शतावरी लागवडीनंतर १८ ते २० महिन्यांनी काढावयास येते. प्रति वर्षी हंगामात शतावरीच्या झुपक्याने वाढणा-या मुळ्या खणून काढाव्यात व वेलीचे खोड तसेच ठेवावे. काढलेली मुळे स्वच्छ करून लगेच मुळांवरची बारीक साल काढून १०-१५ सेंमी लांबीचे तुकडे करावेत. तसेच मुळामधील शीर ओढून काढावी म्हणजे वाळविण्याची प्रक्रिया लवकर होते. चांगली काळजी घेतल्यास प्रति वर्षी प्रति हेक्टर १२ ते १५ क्रिंटल मुळ्या निघतात. भारतातील सर्व फार्मसीमध्ये शतावरीच्या मुळ्या विकत घेतल्या जातात. केवळ आयुर्वेदिकच नव्हे, तर ॲलोपॅथिक आणि होमिओपॅथिक औषधनिर्मितीसाठीही शतावरीच्या मुळ्या लागतात.

## फळांवरील चक्राकार पांढरी माशी



मागील काही वर्षांपासून चक्राकार पांढरी माशी (स्पायरलिंग व्हाइट फ्लाय) ही बहूभक्षी कीड विविध पिकांवर व शोभीवंत वनस्पतींवर मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. ही कीड मूळ कॅरेबियन प्रदेश आणि मध्य अमेरिका येथील असून, जगात प्रथम १९६५ मध्ये फ्लोरिडा राज्यात नोंदविली गेली. भारतात तिची प्रथम नोंद १९९३ मध्ये केरळ राज्यात शाबुकंद (ट्रॅपिओका – कसावा) या पिकावर नोंदविण्यात आली. या किडीची नुकसान करण्याची पद्धत जवळपास सर्व पिकांवर सारखीच दिसत असली तरी हिच्या अनेक प्रजाती भारतात आढळतात. ही कीड रसशोषक असून, पांढरा, मेणासारखा व कापसासारखा चिकट पदार्थ सोडते. तीव्र प्रादुर्भाव झाल्यास पानांवर काळ्या सुट्या बुरशीचे प्रमाण वाढते. परिणामी, पानांचे प्रकाशसंश्लेषण कमी होऊन झाडांची वाढ खुंटते. या किडीमुळे पेरू पिकात ८० टक्क्यांपर्यंत उत्पादन घटल्याच्या नोंदी आहेत. सद्यःस्थितीत या किडीवर नियंत्रण मिळविण्यात एन्कार्सिया हा परोपजीवी मित्रकीटक अतिशय प्रभावी ठरत आहे. काही शेतात या मित्रकीटकांचीही उपस्थितीही मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. या लेखामध्ये आपण चक्राकार पांढरी माशी या किडीविषयी माहिती घेतानाच त्यावरील एन्कार्सिया या परोपजीवी कीटकाच्या परजीवीकरणाची लक्षणेही छायाचित्रांद्वारे समजून घेणार आहोत.

यजमान पिके : ही बहूभक्षी कीड असून, पेरू, नारळ, केळी, पपई, आंबा, सीताफळ, टोमॅटो, मिरची, वांगी, मोसंबी यांसह विविध पिकांवर आढळते. उपलब्ध नोंदीनुसार ही कीड जवळपास ४८१ पिके व वनस्पतींवर उपजीविका करते.

अंडी : अंडी गुळगुळीत, लंबगोल आकाराची, पारदर्शक व फिकट पिवळसर रंगाची असतात. अंड्यांचा बारीक देठ पानांच्या रंध्रात () घट्ट बसलेला असतो. अंड्यांची सरासरी लांबी सुमारे ०.२९ मि.मी. आणि रुंदी ०.११ मि.मी. आढळते.

पिलावस्था : पहिल्या इंस्टारची पिल्ले फिकट पिवळसर व पारदर्शक रंगाची असतात. पाठीचा भाग थोडा उंच असून पाय पूर्णपणे कार्यक्षम असतात.

कोषावस्था : चौथ्या अवस्थेतील पिले म्हणजेच कोष. ही जाड पांढऱ्या मेणासारख्या आवरणाने पूर्णपणे झाकलेली असतात. कोषाची लांबी सुमारे १.०७ मि.मी. आणि रुंदी ०.७१ मि.मी. असते.

प्रौढ : प्रौढ कीड ही जाड पांढऱ्या मेणाच्या धुळीसारख्या आवरणाने झाकलेली असते. डोळे गडद लालसर तपकिरी रंगाचे असतात. पुढील प्रत्येक पंखावर दोन ठळक काळे डाग असतात. नर प्रौढ हा मादीपेक्षा मोठा असतो. नर किडीची लांबी २.४० मि.मी. आणि रुंदी १.२२ मि.मी. असते, तर मादीची लांबी १.८६ मि.मी. आणि रुंदी १.०९ मि.मी. असते.

नुकसानीचे स्वरूप : पिले आणि प्रौढ कीड पानांच्या खालच्या बाजूस मोठ्या प्रमाणात जमून पानातील रस शोषतात. सततच्या रस शोषणामुळे झाडातील पाणी व अन्नद्रव्यांचा समतोल बिघडतो. परिणामी पाने पिवळी पडू लागतात. ती लवकर सुकून गळतात. प्रादुर्भाव तीव्र झाल्यास झाडाची एकूण वाढच खुंटते. ही कीड पांढरा, मेणासारखा व कापसासारखा चिकट पदार्थ मोठ्या प्रमाणात सोडते. हा पदार्थ वाऱ्याने सहज पसरत असल्याने पिकावर कुरूप, अस्वच्छ थर तयार होतो. ह कीड आपल्या विष्ठेद्वारे चिकट मधासारखा द्रव सोडते, त्यावर काळ्या बुरशीची वाढ होते. त्यामुळे प्रकाश संश्लेषण प्रक्रिया बाधित होते. झाडाचे पोषण कमी होते.

व्यवस्थापन : किडीचा प्रादुर्भाव असलेली पाने गोळा करून नष्ट करावीत. झाडाची छाटणी करतेवेळी किडीचा अतिप्रादुर्भाव झालेला भाग काढून टाकावा. पर्यायी यजमान वनस्पतींचा, तणांचा नायनाट करावा. पिकामध्ये पिवळे चिकट सापळे २५ प्रती हेक्टर याप्रमाणे लावावेत.

जैविक नियंत्रण : क्रिप्टोलीमस मॉन्ट्रेझायरी हे उपयुक्त भक्षक मित्रकीटक प्रति झाड १० प्रौढ या प्रमाणात प्रसारण करावे. त्याचप्रमाणे चक्राकार पांढरी माशी या किडीच्या कोष अवस्थेवर परजीवीकरण करणारा एन्कार्सिया हा परोपजीवी मित्रकीटक या किडीच्या नैसर्गिक नियंत्रणामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यांची संख्या शेतात योग्य प्रमाणात दिसत असल्यास त्यांचे संरक्षण व संवर्धन करावे. त्यांची उपस्थिती पुरेशी असल्यास रासायनिक फवारणी टाळावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक चहा दिन

### महत्वाच्या घटना

१८०३ : नागपूरकर भोसलेंनी ओरिसाचा ताबा इस्ट इंडिया कंपनीकडे दिला.
१९११ : बनारस हिन्दू युनिवर्सिटी सोसायटी ची स्थापना केली गेली.
१९१७ : युरोप चा देश मॉल्डोवा ने रशिया पासून स्वतःला स्वंतत्र घोषित केले.
१९४१ : जपानी सैन्याचा हाँगकाँगमध्ये प्रवेश झाला.
१९५३ : भारताच्या एस विजयलक्ष्मी पंडित ह्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पहिल्या महिला अध्यक्ष बनल्या होत्या.
१९६० : नेपाळचे राजा महेन्द्र यांनी देशाचे संविधान, संसद आणि कॅबिनेट निलंबित करून थेट शासन लादले.
१९६१ : हिटलर च्या आयोजकांपैकी एक ॲडॉल्फ आयचमन याला फाशीची सजा दिली गेली.
१९७० : व्हेनेरा ७ हे रशियाचे अंतराळयान यशस्वीपणे शुक्र ग्रहावर उतरले. पृथ्वी सोडुन इतर कुठल्याही ग्रहावर उतरणारे हे पहिलेच यान होते.
१९७१ : बांगलादेश स्वतंत्र झाला.
१९७६ : सामोआचा संयुक्त राष्ट्रसंघातप्रवेश
१९९१ : चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांना 'ऑस्कर पारितोषिक' जाहीर
१९९२ : ला भारतीय चित्रपट निर्माता सत्यजित रेऑस्कर पुरस्कारानेसन्मानित.
१९९७ : ला भारताच्या लेखिका अरुंधती रॉय यांना "द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज" या पुस्तकासाठी बुकर पुरस्काराने सन्मानित.
१९९८ : बँकॉक येथील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला कबड्डीमधे सलग तिसर्यांदा सुवर्णपदक
२००० : ला चेरनोबिल न्यूक्लियर पॉवर प्लांट जनावर आणि पक्षांना हानिकारक असल्याने कायमचे बंद करण्यात आले.
२००१ : इटली चे पिसा टॉवर ११ वर्ष बंद राहिल्यानंतर पुन्हा उघडण्यात आले होते.
२००३ : फ्रांसचा फुटबॉलपटू झिनादिन झिदान यांची वर्षातील सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून निवड झाली.
२००३ : भूतान ने त्यांच्या देशात राहणाऱ्या भारतीय वेगळेवादी यांच्या विरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली.
२००५ : इराक मध्ये नवीन सरकार निवडण्यासाठी मतदान पार पडले.
२००८ : झालेल्या संसद हल्ल्याची चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय अन्वेषण एजन्सीच्या स्थापनेच्या प्रस्थावला मंजुरी.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

६८७ : पोप सर्गिअस (पहिला) (मृत्यू: ८ सप्टेंबर ७०१)
१८३२ : गुस्ताव्ह आयफेल फ्रेंच वास्तुरचनाकार आणि अभियंता (मृत्यू: २७ डिसेंबर १९२३)
१८५२ : हेन्री बेक्वेरेल नोबेल पारितोषिक विजेते (१९०३) फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २५ ऑगस्ट १९०८)
१८६१ : दुर्यिया मोटर वॅगन कंपनीचे संस्थापक चार्ल्स दुर्यिया यांचा जन्म. (मृत्यू: २८ सप्टेंबर १९३८)
१८९२ : जे. पॉल गेटी गेटी ऑईल कंपनीचे संस्थापक, अमेरिकन उद्योजक आणि लोकहितबुद्धी (मृत्यू: ६ जून १९७६)
१९०३ : स्वामी स्वरुपानंद (मृत्यू: १५ ऑगस्ट १९७४)
१९०५ : इरावती कर्वे साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेत्या मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ (मृत्यू: ११ ऑगस्ट १९७०)
१९०५ : चौथ्या लोकसभेचे अध्यक्ष रघुनाथ केशव खाडिलकर यांचा जन्म.
१९२२ : भारताचे माजी क्रिकेटर रुसी कूपर यांचा जन्म.
१९२६ : प्रहसन लेखक व अभिनेते बबन प्रभू यांचा जन्म.
१९३२ : टी. एन. शेषन प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सरकारी अधिकारी
१९३३ : लोकसाहित्याचे अभ्यासक लेखक डॉ. प्रभाकर मांडे यांचा जन्म.
१९३३ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक बापू यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑगस्ट २०१४)
१९३५ : उषा मंगेशकर पार्श्वगायिका व संगीतकार
१९३७ : संतसाहित्य, भाषाविज्ञान अभ्यासक प्र. कल्याण काळे यांचा जन्म.
१९७४ : भारताच्या प्रसिद्ध व्होकलायझर रसूलन बाई यांचे निधन.
१९७५ : भारताचे नौदल सैनिक नवांग कापडिया यांचा जन्म.
१९७६ : भारतीय फुटबॉलपटू बैचुंग भुतिया यांचा जन्म.
१९८१ : भारतीयहॉकीखेळाडू भारत छत्री यांचा जन्म.
१९८८ : भारताची प्रसिद्ध कुश्तीपटू गीता फोगाट यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४९ : छत्रपती शाहू महाराज (जन्म: १८ मे १६८२)
१८५० : स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधानमंत्री आणि पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १८७५)
१८७८ : बेकिंग पावडरचे शोधक आल्फ्रेड बर्ड यांचे निधन.
१९५० : सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष, भारतरत्न (मरणोत्तर १९९१) (जन्म: ३१ आक्टोबर १८७५)
१९५२ : ला स्वातंत्र्य सैनिक पोट्टि श्रीरामुलु यांचे निधन.
१९६६ : वॉल्ट इलायन डिस्ने ॲनिमेशनपटांचे प्रणेते, 'मिकी माऊस'चे जनक (जन्म: ५ डिसेंबर १९०१)
१९८५ : शिवसागर रामगुलाम मॉरिशसचे पहिले प्रधानमंत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९००)
२००० : प्रसिद्ध लेखक तसेच पत्रकार गौर किशोर घोष यांचे निधन.
२०१३ : लोकसभेचे सदस्य सीस राम ओला यांचे निधन.
२०१३ : इंडिअन आयडल च्या दुसऱ्या सीजन चे विजेते संदीप आचार्य यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुडे कायम स्मरणात-भाऊसाहेब घुगे

## शिवसेना जनसंपर्क कार्यालयात गोपीनाथ मुंडे य जयंती साजरी

बदनापूर । प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंढे यांच्या सामाजिक कार्याने समाजातच नव्हे तर सामाजिक ,राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांच्या कायम स्मरणात राहील असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे आयोजित लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंढे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात केले .या वेळी त्यांनी सांगितले की, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंढे यांच्याशी माझा जवळचा संबंध आला असून ते जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक विकासात्मक विषयावर माझ्यासोबत चर्चा करत होते पुन्हा मुंडे साहेबांसारखे नेते होने नाही असे घुगे यांनी सांगीतले यावेळी भोकरदन शिवसेना तालुकाप्रमुख नानासाहेब वानखेडे यांनी यांनी स्वर्गीय गोपीनाथ मुंढे



यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले तसेच यावेळी केंद्रीय माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधनाने शोक व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .यावेळी या कार्यक्रमात प्रवीण फुके, महादू गीते, ईश्वर झुंबड, भगवान मदन, हरिभाऊ कापसे, कैलास दुधानी, रामेश्वर नागवे, रमेश चोरमारे, साईनाथ लहाने,राजू वायाळ, छायाताई जराड,रामेश्वर नागवे ,मनोज शिंदे, दीपक दिघे, विलास खैरे, पत्रकार संजय भुजाळ, नारायण बामणे, विलास खैरे, नंदू दाभाडे गणेश शिंदे अनिल जावळे ,दीपक मिसाळ ,करण बनस्वाल, दिनकर बारगाजे, अनिल देशमुख, मनीष काळे ,अशोक मगरे ,प्रल्हाद भडांगे,कैलास शिंगारे ,विलास पेरकर ,शिवाजी कदम ,विठ्ठल खरात ,नंदू अंभोरे कविता जावळे, ईश्वर कवडे, केदार गीते, सखाराम शिरसागर आदींची उपस्थिती होती या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल दाभाडे, कैलास वैद्य ,जालिंदर शेरे, राहुल आघाव, सिद्धेश्वर बनकर, बाळासाहेब वाघ, रामेश्वर मोहिते यांनी प्रयत्न केले.

## दिव्यांग व्यक्ती या समाजाची खरी ताकद आहेत -भास्कर दानवे



जालना। प्रतिनिधी

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जालना शहरातील दिव्यांग बांधवांचा आज दि.१४ डिसेंबर रोजी चित्रकुट निवासस्थानी सन्मान पूर्वक हार घालून व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संवाद साधताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, दिव्यांग व्यक्ती या समाजाची खरी ताकद आहेत.

फ्शारीरिक अडचणी असूनही त्यांनी जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर जीवनातील अनेक आव्हाने समर्थपणे पेललेली आहेत. दिव्यांग व्यक्तींमध्ये असलेले कौशल्य, सकारात्मक दृष्टिकोन व संघर्षाची तयारी समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांना योग्य सन्मान, संधी व समान वागणूक मिळाल्यास ते समाजाच्या सर्वांगीण प्रगतीत मोलाचे योगदान देतील. दिव्यांगांचा सन्मान म्हणजे मानवी मूल्यांचा सन्मान असल्याचेही भास्कर आबा दानवे यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्री. सिद्धीविनायक मुळे, श्री. धनराज काबलिये, प्रा. कपिल दहेकर, जीवन सले, सुनील राठी, प्रा. राजेंद्र भोसले, देविदास देशमुख, राजेश जोशी, प्रविण मोहता, बाबासाहेब उगले, अजित मानधने, कल्याण भदनेकर, अमन मित्तल, गणेश खरात, रमेश गोगडे, राजेश देसार, निलेश गवळी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंगळवारी खरेदी-विक्री संघाची चेअरमन,व्हाईस चेअरमन पदाची निवड

अंबड। प्रतिनिधी

अंबड खरेदी विक्री संघ च्या निवडणुकीमध्ये संचालक मंडळ बिनविरोध निवड झाली असली तरी आता लक्ष लागले चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाच्या निवडकडे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्या बाजूने जास्त संचालक मंडळ बिनविरोध झाले असल्याचे बोलल्या जात आहे तसेच दुसरीकडे आमदार नारायण कुचे यांचे पण काही संचालक मंडळ बिनविरोध झाले आहे. आता यामध्ये जादूची कांडी कोण चालणार आहे याचं चित्र १६ डिसेंबर रोजी दिसून येणार आहे. निवडसाठी निवड पदाधिकारी निवड सभा नोटीस मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांचे कार्यालयीन अंबड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म. या संस्थेच्या नवनिर्वाचित संचालकामधुन संस्थेच्या मंजुर आदर्श उपविधीतील तरतुदीनुसार पदाधिकारी निवडीच्या सभेचे अध्यासी अधिकारी माणून श्री. संजय भोईटे, सहायक निबंधक, अधिकारी अंबड यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार १६.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयात सभा आयोजित करण्याबाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार तालुका सहकारी खरेदी विक्री संघ या संस्थेच्या सर्व नवनिर्वाचित संचालकांना सुचित करण्यात येते की, आपले संस्थेच्या नोंदणीकृत उपविभागातील तरतुदीनुसार पदाधिकारी निवडी करीता अध्यासीअधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या सभागृह / कार्यालयात नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सभेत नवनिर्वाचित संचालक मंडळातुन निवडावयाच्या पदाधिकारी निवडीचे दिवशी सकाळी निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात येईल व सदर कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येईल, शासन नियमाप्रमाणे वेळेवर सर्व संचालकांनी उपस्थित रहावे. (के. एम. कुलकर्णी) व्यवस्थापक अंबड तालुका सहकारी खरेदी विक्री यांच्यावतीने सर्व संचालक यांना कळविण्यात आले आहे १ नरवडे किशोर बंडेराव, २ हुलमुख सुधाकर परमेश्वर ३शेळके विष्णु भगवान ४ बिर पंढरीनाव शेषराव ५ कनके संजय आप्पासाहेब ६ सपकाळ शेषराव धुराजी ७भोजने भगवान मनाजी ८ लांडे उध्दव जगन्नाथ ९ तनपुरे नकुल बाबुराव १० हुसे अनंत रावसाहेब ११ जाधव संजय गंगाधर १२ ठाकुर दिपकसिंग प्रल्हादसिंग १३ उघडे देविदास भाऊ १४ तायडे आसराबाई राणुजी १५ सिनगारे शांताबाई काकासाहेब १६ बागवान जैतुनची बाबुलाल १७ चेपटे सतिश भगवान या सर्व संचालकांनी चेअरमन व व्हॉइस चेअरमन निवड साठी हजर राहावे असे निवडणूक अधिकारी यांच्या वतीने कळविण्यात आली आहे

## झूक गया साला..! अखेर.. माळीवाडा वेस पाडण्याचा निर्णय रद्द

### इतिहासप्रेमींचा फटाके फोडत एकच जल्लोष;निर्णयाचे शहरवासियांकडून स्वागत

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर(अहमदनगर) शहराची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अस्मिता व स्वाभिमान असणारी माळीवाडा वेस पाडण्याच्या महापालिकेच्या निर्णयावर तमाम शहरप्रेमींच्या रेटयापुढे महापालिकेन मान तुकविली असून प्रशासनाला या निर्णयापासून माघार घ्यावी लागली आहे. तमाम नगरकरांच्या तीव्र भावन आणि वाढता रोष पाहून झूक गया साला..! अशीच काहीशी अवस्था मनपा प्रशासनाची झाली आहे. जनसामान्यांच्या रेटयापुढे मनपा प्रशाससनाने माघार घेत हा निर्णय रद्द केला आहे. या निर्णयानंतर तमाम इतिहासप्रेमींनी फटाके फोडत एकच जल्लोष केला.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या नावाखाली शहराची ऐतिहासिक वारसा असलेली माळीवाडा वेस पाडणयाचा निर्णय महापालिकेने जाहीर केला होता. या निर्णयाविरोधात तमाम इतिहास प्रेमी नागरिकांनी या निर्णयाला कडाडून विरोध केला होता.

या संदर्भात रसीक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर, युवा नेते नीतीन भुतारे यांच्यासह तमाम इतिहास व सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्जांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदविल्या. तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने शनिवारी माळीवाडा येथे एकत्र येत जोरदार निदर्शने आणि घोषणाबाजी करीत शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात आले. खा. निलेश लंके यांनीही ही वेस पाडणे म्हणजे केवळ अनुचित नव्हे तर इतिहास आणि सांस्कृतिक ओळख पुसरण्याचा प्रकार असल्याचा तिखट प्रहार करत या निर्णयाला विरोध केला होता.

तसेच शहरातील अनेक इतिहासप्रेमींनी तीव्र आक्षेप नोंदविला आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे वेस पाडण्याचा निर्णय रद्द करण्याशिवाय महापालिकेपुढे पर्याय राहिला नाही. काल सायंकाळी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी या संदर्भात एका निवेदनाद्वारे माळीवाडा वेस पाडण्याचा निर्णय रद्द केल्याची माहिती दिली. त्यानंतर तमाम नगरकर व इतिहास आणि सांस्कृतिक प्रेमींनी माळीवाडा वेशीत फटाक्यांची आतषबाजी करीत या निर्णयाचे स्वागत केले. जनरेट्यापुढे महापालिकेला मान तुकवावी लागली असून अखेर झूक गया साला अशी काहीशी भावना व्यक्त करण्यात आली.

## हिवरेबाजार एकता, अभिमान आणि प्रेरणेचे प्रतिक-प्रसाद मिजार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

१७ महाराष्ट्र बटालियन नॅशनल कॅडेट कॉर्प्सतर्फे ''एक भारत श्रेष्ठ भारत'' शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरातील तामिळनाडू, पाँडेचारी, अंदमान आणि निकोबार मधील कॅडेट्सने १२ आणि १३ डिसेंबर रोजी आदर्शगाव हिवरेबाजार येथे भेट दिली. यावेळी बोलताना कर्नल प्रसाद मिजार म्हणाले

या शिबिरातून हिवरेबाजारमधील एकता, संस्कृती, रूढी-परंपरा, भाषा तसेच जलसंधारण, पाणलोट विकास वृक्षारोपण, मृदासंधारण, आपत्ती व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, पाण्याचा ताळेबंद याद्वारे एन.सी.सी कॅडेट्स मध्ये प्रेरणा, शिस्त आणि देशप्रेम हे गुण विकसित होऊन पर्यावरण संरक्षण, श्रमप्रतिष्ठा, नेतृत्व, संघकार्य, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि आणि राष्ट्रवादाची भावना वाढीस लागेल. शिबिरात सहभागी होऊन, एन सी सी कॅडेट राष्ट्रीय एकात्मतेला चालना देऊन त्यांचा दृष्टिकोन व्यापक करतील आणि त्यांचे अनुभव समृद्ध करतील. हिवरेबाजार ''एकता, अभिमान आणि प्रेरणेचे प्रतिक'' आहे असे प्रतिपादन कर्नल प्रसाद मिजार यांनी केले. यावेळी पदमश्री डॉ. पोपटराव पवार, सरपंच विमलताई ठाणगे, एस. टी. पादीर सर, जेसीओ सुभेदार यशवंत सिंग, ए.एन.ओ भरत होळकर, मंगेश ठाणगे मेजर, राज ठाणगे मेजर, नंदकुमार झावरे आणि पी. आय स्टाफ उपस्थित होते.

## अहिल्यानगर महापालिकेसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती

अहिल्यानगर

आगामी महापालिकांच्या निवडणुकांच्या हालचाली राज्यस्तरावर सुरु झाल्या असून, सोमवारनंतर केव्हाही निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. अहिल्यानगर महापालिका निवडणुकीसाठी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी सात निवडणूक निर्णय अधिकारी व सहा सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याचे आदेश जारी केले आहेत.

महापालिकेसाठी १७ प्रभाग असून, प्रत्येक प्रभाग चार सदस्यीय आहे. निवडणुकीच्या माध्यमातून ६८ नगरसेवक निवडले जाणार आहेत. या निवडणुकीसाठी आवश्यक असलेली प्रभागरचना, आरक्षण आणि मतदारयादी असे तीन घटक महत्त्वाचे असून, प्रभागरचना व आरक्षणाची अंतिम प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ३ लाख ९ हजार ७ मतदारसंख्या असलेली प्रारुप मतदारयादी प्रसिध्द झाली असून, ९ हजारांवर हरकती प्राप्त झाल्या आहेत. या हरकतींवर सुनावणीचे काम सुरु आहे. १५ डिसेंबरला अहिल्यानगर महापालिकेची अंतिम मतदारयादी प्रसिध्द होणार आहे.निवडणुकीसाठी आवश्यक असणारी पूर्वतयारी जवळपास पूर्ण झालेली आहे. अहिल्यानगर महापालिकेची अंतिम मतदारयादी प्रसिध्द होताच, येत्या आठ दिवसांत अहिल्यानगर महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे. नाशिक येथील विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या सात अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारीपदी नियुक्ती केली आहे. तहसीलदार दर्जाच्या सहा तहसीलदारांची सहाय्यक निवडणूक अधिकारीपदी नियुक्ती केली. सात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपैकी एकाची आचारसंहिता कक्ष प्रमुखपदी नियुक्ती होण्याची शक्यता आहे. निवडणूक कालावधीतील खर्चाचा हिशेब तपासणीसाठी स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालयाचे सहय्यक संचालक रमेश कांतीलाल कासार यांची लेखा अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.


नगरपंचायत कार्यालय, आष्टी
ता. आष्टी जि.बीड
Email : coaashti@gmail.com
Pho No. 02441-282880

जाहीर प्रगटन

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खडे यांमुळे होणारे अपघात व मृत्यु याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ७१/२०१३ ची सुनावणी दि. १३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून सदर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारीत केले आहे. त्यानुसार नगर पंचायत क्षेत्रात रस्त्यावरील खड्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणे बाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणे चावत निर्देश दिले आहेत. त्यानुसार आष्टी नगर पंचायत जि बीड हद्दीतील नगर पंचायत मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील मृत्युमुखी व अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणे बाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका क्र. ७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे समिती गठीत करण्यान आली आहे.

| अ.क्र. | नगर पंचायतची गठीत केलेली समिती यांचे पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| ०१ | मुख्याधिकारी | नोडल अधिकारी |
| ०२ | विद्यमान सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड | सदस्य |
| ०३ | स्थापत्य अभियंता | सदस्य |
| ०४ | रचना सहाय्यक | सदस्य |
| ०५ | लेखापाल | सदस्य |
| ०६ | कार्यालयीन अधिक्षक | सदस्य |

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत आष्टी


## बाबा आढाव यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व विविध सामाजिक संघटना यांच्या वतीने श्रद्धांजली

अहिल्यानगर । प्रतिनिधी

कामगार, शेतकरी, वंचित घटकांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे दिग्गज नेते बाबा आढाव यांच्या स्मरणार्थ शेवगावमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व विविध सामाजिक संघटना यांच्या वतीने श्रद्धांजली सभा अत्यंत भावनिक वातावरणात पार पडली. विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, शेतकरी-मजूर चळवळीचे कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने हजर राहून या थोर समाजहितचिंतक नेत्याप्रती आदर व्यक्त केला.



या कार्यक्रमाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ.सुभाष पाटील लांडे, वंचित बहुजन आघाडी चे राज्य उपाध्यक्ष किसन चव्हाण, डॉ.संजय लड्डा,सुनील रासने, उ. बा. ठा. तालुकाध्यक्षअवीनाश मगरे , हमाल माथाडी संघटनेचे तालुकाध्यक्ष एजाज काझी, संजय नांगरे,अ.नि.स तालुका अध्यक्ष प्रा. बबनराव धावणे,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे.प्यारेलाल शेख, प्रा.चिमाजी धनवडे, प्रा.आशोक सोनवणे, प्रा.शेवाळे, प्रा.फलके, शिवाजीराव मडके,आयुब पठाण, प्रा.कारभारी नजन, प्रा.हरिश्चंद्र शिंदे, प्रा.शिवाजी नजन,उचल फाउंडेशन चे सचिन खेडेकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय ठरली. सर्वांनी एकमुखाने व्यक्त केले की ''बाबा आढाव हे फक्त नेते नव्हते, तर ते एक सामाजिक विचार होते. त्यांनी संघटित चळवळींना नवा उर्जा संचार दिला आणि असंख्य कामगारांना आयुष्याचा आधार दिला.'' सभेत बोलताना वक्त्यांनी बाबा आढाव यांच्या दीर्घ सामाजिक प्रवासाची आठवण केली.

पुण्याच्या महामंडळ कामगार चळवळ, निर्भय लढाऊ भूमिकेने व्यवस्थेला दिलेले आव्हान, शोषितांच्या प्रश्नांवर निर्भीड आवाज या सर्व मुद्द्यांचा उल्लेख करण्यात आला. त्यांच्या कामामुळे लाखो कामगारांचे जीवन बदलले, त्यांना संघर्षाची दिशा आणि न्याय मिळवण्याची ताकद मिळाली, असे मान्यवरांनी नमूद केले. वक्त्यांनी पुढे सांगितले की, ''आजच्या काळात बाबा आढाव यांचे विचार, त्यांची तत्त्वनिष्ठता आणि निःस्वार्थ लढा अधिकच महत्त्वाचा आहे. संघटित होऊनच समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळू शकतो, हा संदेश त्यांनी दिला. हा वारसा जपण्याची जबाबदारी आपली आहे. कार्यक्रमादरम्यान त्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेणारे निवेदन सादर करण्यात आले. नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी 'कामगारशेतकरी संघर्षाची मशाल पुढे नेऊ' असा संकल्पही व्यक्त केला.या शोक सभेचं सुत्र संचलन संजय नांगरे यांनी केले. सभेच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून बाबा आढाव यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शेवगाव शहरात दिवसभर त्यांच्या आठवणी जागवल्या जात होत्या आणि ''लढा संपला नाही, तो पुढे नेऊ'' असा एकजूट संदेश सर्वत्र उमटत होता.

## वक्फ़च्या इतिहासात पहिल्यांदाच ऑडिट रिपोर्ट सदनाच्या पटलावर

### अध्यक्ष समीर काझी यांच्या प्रभावी कार्यशैलीची चुणूक

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ऑडिट रिपोर्ट विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आलंय.विशेष म्हणजे वक्फ मंडळाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडलं.मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या प्रयत्नाने हे अभूतपूर्व यश मिळाले आहे.विधानसभेच्या पटलावर पहिल्यांदाच ऑडिट रिपोर्ट आल्याने सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या बड्या नेत्यांनी समीर काझी यांचे विशेष कौतुक करत त्यांचे अभिनंदन ही केलं.या वेळी पुढेही दरवर्षी वक्फचे ऑडिट पटलावर ठेवण्यास आम्ही कटिबद्ध राहू,असा विश्वास समीर काझी यांनी व्यक्त केला.

नागपुरात विधानसभेचे आठ दिवसीय हिवाळी अधिवेशन सुरू आहेत. तत्पूर्वी कलम-८१ अन्वये वक्फ मंडळाला दरवर्षी आपला लेखा परिक्षण विधानसभेच्या पटलावर ठेवणे अनिवार्य आहे.असे असतांना काही अडचणी व सुसूत्रता नसल्याने ऑडिट पत्तलावर ठेवले जात नव्हते.समीर काझी यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार हाती घेतल्या नंतर लेखा परीक्षण विभागाला सक्षम करण्याचं निर्देश दिले.तसेच गेल्याच महिन्यात ऑडिट रिपोर्ट पत्तलावर ठेवण्या साठी तयारी करा,म्हणून आदेशीत कलम होते.मुख्यकार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद यांनी तात्काळ या बाबत तयारी सुरू केली होती.त्या मुळेच २००२-३ ते २०१७-१८ कालावधीचा ऑडिट रिपोर्ट पटलावर ठेवण्यात आलंय.

# समाजाच्या भल्यासाठी सकारात्मक पत्रकारितेची गरज -पद्मश्री पोपटराव पवार

बीड । प्रतिनिधी

आज समाजाची स्थिती खालावत आहे .लहान लहान मुले गुटक्याच्या व्यसनाधीन होत आहेत. एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दहा ते बारा कोटीचा गुटखा विकला जात आहे .शेतकरी हवालदिल आहे. समाजातील सकारात्मक ऊर्जा संपत आहे. अशा परिस्थितीमध्ये सकारात्मक पत्रकारिता फार महत्त्वाचा विषय आहे. समाजाला योग्य दिशेला नेण्यासाठी पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असून पत्रकारांनी आता आत्महत्येच्या बातम्या सोडून शेतकऱ्यांनी शेतीत केलेल्या प्रयोगाच्या सकारात्मक बातम्या छापाव्यात. असा आग्रह पद्मश्री पोपटराव पवार यांनी मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण प्रसंगी बोलताना धरला. यावेळी त्यांनी देवडी हे गाव आदर्श गाव करण्याचा संकल्प केला. यात मराठी पत्रकार परिषदेची महत्त्वाची भूमिका असेल असे यावेळी त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आरोग्य कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागाचे अध्यक्ष राजाभाऊ अदाटे, आरोग्य विभागाचे प्रमुख दिपक कैतके, मराठी पत्रकार परिषदेच्या मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोषाध्यक्ष मन्सुर भाई शेख,सुनिल लोणकर, डिजीटल मिडीया राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सत्कारमूर्ती ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब, ज्येष्ठ पत्रकार सुभाष देशमुख, शेतीनिष्ठ शेतकरी गोरख झाटे, कल्याण कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.








यावेळी पत्रकारांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याच वेळी बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारांचाही सत्कार करण्यात आला. यामध्ये संपादक राजेंद्र आगवान, लोकमतचे माजी जिल्हा प्रतिनिधी जगदीश पिंगळे , धुळ्याचे पत्रकार गो.पी. लांडगे, वडवणीचे सुभाष वाव्हळ यांचा सत्कार करण्यात आला.

### पत्रकारांसाठी स्वतंत्र आरोग्य कक्षासाठी प्रयत्न करू- मंगेश चिवटे

यावेळी बोलताना मंगेश चिवटे यांनी पत्रकारांसाठी स्वतंत्र आरोग्य कक्ष निर्माण करू यातून महाराष्ट्रातील सर्व पत्रकारांसाठी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणारे एक स्वतंत्र कक्ष असेल. याबरोबरच समाजामध्ये अपंगांसाठी आणि कॅन्सर ग्रस्तांसाठी ठाणे जिल्ह्यामध्ये स्वर्गीय आनंद दिघे यांच्या नावाने अनेक हॉस्पिटल चालू झाल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी एकही रुपया खर्च न करता नागरिकांना सुविधा मिळतात हेही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या आईच्या नावाने एक सुसज्ज हॉस्पिटल या ठिकाणी उभे राहत आहे ज्या ठिकाणी कॅश काउंटरच नसेल आणि सर्व सुविधा मोफत मिळतील असे त्यांनी आवर्जून सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की माझे आजोबा मराठी पत्रकार परिषदेशी जोडलेले होते. माझे वडीलही मराठी पत्रकार परिषदेत काम करत होते आणि मीही आता मराठी पत्रकार परिषदेची जोडलेला आहे. त्यामुळे आता पत्रकारांच्या आरोग्य समस्यांसाठी कधीही गरज पडली तर मला निर्धास्तपणे फोन करा मी तत्पर असेल असे सांगायला ते विसरले नाहीत. याच वेळी त्यांनी देवडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.

पुढे बोलतांना पोपटराव पवार म्हणाले की आज शेतीची स्थिती गंभीर आहे. त्यासाठी सर्वांनी सकारात्मक प्रयत्न केले पाहिजेत. आज हवामानात बदल होत आहे. मोठ्या प्रमाणात वादळी पाऊस येऊन शेतीचे नुकसान होत आहे. शेतीच्या उत्पादनात घट होत आहे. शहरे वाढत चालली आहेत. मात्र ग्रामीण भागात बकाल अवस्था निर्माण होत आहे. शासनाकडे असे निश्चित कार्यक्रम ग्रामीण भागासाठी नाहीत. ग्रामविकास आणि कृषी विकास साठी निश्चित धोरण निर्माण झाले पाहिजे. या सर्व बाबीसाठी पत्रकारांनी पुढाकार घेऊन सकारात्मकता आणली पाहिजे. शेतकरी आत्महत्याच्या बातम्या कमी आणि शेतातील विविध प्रयोगाच्या बातम्या जास्तीत जास्त छापल्या पाहिजेत. लोकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी पत्रकारांनी जास्तीत प्रयत्न केले पाहिजेत .मराठी पत्रकार परिषद यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. समाजासाठी विविध आंदोलने परिषदेच्या वतीने होत आहेत. ते करत असताना आदर्श गाव निर्माण करण्यासाठी ही त्यांनी प्रयत्न करावेत. याबरोबर शेतीतील नवीन नवीन प्रयोग लोकांसमोर आणण्यासाठी ही मराठी पत्रकार परिषदेने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांनी यावेळी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या विकासाचे व्हिजन विषद केले. नेत्यांमध्ये विकासाचे व्हिजन असेल तर काम चांगले होते. नितीवान समाजासाठी काम केले पाहिजे असे बोटावर मोजण्याइतके लोक आहेत. जे समाजासाठी काम करतात. हे सांगताना हिवरे बाजार उभा करण्यासाठी ३५ वर्षे लागली. हे इथे सांगायला विसरले नाहीत. आज हिवरे बाजारचा कायापालट झाला. मात्र या ठिकाणी येणाऱ्या इतर गावांनी प्रेरणा घेऊन काम पुढे चालू ठेवले तर त्याचा उपयोग आहे. आज अनेक लोक हिवरे बाजार मध्ये येतात. मात्र हिवरे बाजार सारखे काम करण्यासाठी प्रयत्न फार कमी लोक करतात असे यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले.


◀◀ पान २ वर

# शहर व परिसरातील बारवांची राज्य बारव बचाव समितीचे सदस्य रोहन काळे यांच्याकडून पाहणी

बीड । प्रतिनिधी

बारव निर्मिती ही तत्कालीन राज्यकर्त्यांची उत्कृष्ट जलनीती होती. होळकरशाहीतील थोर शासनकर्ती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बारव निर्मितीचे भारतभर जाळे निर्माण केलेले आहे. काळाच्या ओघात दुर्लक्षामुळे बारवा नामशेष होत चालल्या आहेत. बारवांचे जतन व संवर्धन करणे म्हणजे केवळ जलसाठा टिकवणे नव्हे, तर इतिहास जिवंत ठेवणे होय. हाच विचार घेऊन शासन स्तरावर महाराष्ट्र बारव समिती गठित करण्यात आली आहे. बारव संवर्धनासाठी स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

राज्यस्तरीय महाराष्ट्र बारव समितीचे अशासकीय सदस्य श्री. रोहन काळे (मुंबई) यांनी बीडला भेट दिली. यावेळी त्यांनी खंडेश्वरी मंदिर बारव, फुलईनगर येथील कलिंदेश्वर बारव, पापनेश्वर बारव, शनी मंदिर बारव, पेठ बीड येथील चमन बाग तसेच शिदोड परिसरातील बारवांची प्रत्यक्ष पाहणी केली. या प्रसंगी श्री. रोहन दादा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र बारव मोहीम बीड जिल्हा समन्वयक पदी सचिन लुचारे यांची निवड करण्यात आली. बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र बारव मोहीम व स्वच्छता मोहिमेमध्ये सक्रिय



# एकीकडे अतिवृष्टीने शेतकरी कंगाल तर महसूलच्या आशीर्वादाने वाळू माफिया मालामाल

आष्टी । प्रतिनिधी

**मागील काळामध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतकरी मेटाकुटीस आला आहे अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना अद्यापही हवी ती मदत शासनाकडून मिळालेली नाही एकीकडे शेतकरी हवालदील असला तरी दुसरीकडे मात्र आष्टी तालुका प्रशासनाच्या आशीर्वादाने वाळू माफिया मात्र मालामाल झाल्याचे दिसत आहेत.**

कधी नव्हे ते आष्टी तालुक्यात व परिसरात फार मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली जवळपास ८० वर्षानंतर असा प्रचंड पाऊस झाले असल्याचे जेष्ठ नागरिक बोलत होते या पावसाने अक्षरशः दाणादाण उडवली यामध्ये काहींचे पिकासहित शेत वाहून गेले तर काहींना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागले अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र सरकारने मोठी मदत दिली असल्याचा कांगावा केला मात्र पदरात तुटपुंजी रक्कम पडल्याने शेतकरी वर्गात संताप निर्माण होत आहे अशाच परिस्थितीमध्ये नदीकाठी काही हजारो ब्रास वाळू या अतिवृष्टीमुळे वाहून आले आहे या वाळूची मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू विक्री महसूल प्रशासनाच्या अर्थपूर्ण दुर्लक्ष करून व पोलीस प्रशासनाच्या डोळे असून आंधळेपणाचे सोंग घेऊन होत आहे यामध्ये वाळू वाले मोठे मालामाल झाले आहे तर शेतकरी मात्र आज कंगाल झाला आहे. आष्टी तालुक्यातली वाळू शेजारी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी जात आहे जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल या आवेध वाळू विक्रीमुळे आत्याच्या बुडला जात आहे जर ही वाळू लिलाव पद्धतीने विक्रीस काढली तर महसूल प्रशासनाला देखील यातून मोठा महसूल वसूल करता येईल मात्र तसे न होता या वाळूची अवैधरित्या विक्री होते आहे. आष्टी तहसील प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात वाळू माफियांना अभय मिळत असल्याने रात्रंदिवस अवैधरित्या वाळू उपसा केला जात आहे यामध्ये पोलिस आणि तहसील विभाग मूग गिळून गप्प आहेत

# ॲड. मंगेश ससाने यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा समता परिषदेच्या वतीने निषेध

बीड । प्रतिनिधी

माजलगाववरून पुण्याला जात असताना ओबीसी आंदोलक ॲड. मंगेश ससाने यांच्या गाडीवर अज्ञातांनी केलेल्या दगडफेकीचा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष राऊत यांनी निषेध व्यक्त केला असूनअशा भ्याड हल्ल्यांनी समाजसेवेचा आणि न्यायाचा लढा थांबणार नाही. पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन दोषींचा तात्काळ शोध घेऊन अटक करावी व त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी देखील ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

दोन महिन्यापूर्वी ओबीसी आंदोलक पवन करवर यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाची माहिती घेण्यासाठी ॲड. मंगेश ससाने माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गेले होते. येथे पोलीस निरीक्षकांची भेट घेऊन धारूर मार्गे इंदापूर, पुण्याकडे जात असताना विसावा हॉटेलच्या पुढे दोन दुचाकीवरून आलेल्या तरुणांनी ॲड. मंगेश ससाने यांच्या गाडीवर मागील बाजूने दगडफेक केली. त्यानंतर गाडीचे दरवाजाचे काच फोडले. यावेळी ॲड. मंगेश ससाने यांनी गाडी पळवून थेट धारूर पोलीस ठाणे गाठले. या दगडफेकीच्या हल्ल्यामध्ये ॲड. मंगेश ससाने यांच्या डोक्याला काच लागल्याने किरकोळ जखम झाली. दगडफेकीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ पोलीस स्टेशन गाठल्याने पुढील अनर्थ टाळला असला तरी सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीवर अशा प्रकारे हल्ला करणे अत्यंत निंदनीय आहे. या हल्ल्याचा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला असून पोलिसांनी हल्लेखोर युवकांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ अटक करावी व कठोर कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

# पीएम किसानचे बंद हप्ते पुन्हा सुरु करण्यासाठी विशेष मोहीम –शेळके

पाटोदा । प्रतिनिधी

दिनांक: १४ डिसेंबर २०२५ पी.एम.किसान योजनेअंतर्गत बंद पडलेले हप्ते पुन्हा सुरू करण्यासाठी विशेष मोहीम पाटोदा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पी.एम.किसान योजनेअंतर्गत आधी सुरू असलेले परंतु आता बंद पडलेले शेतकरी लाभार्थींचे हप्ते पुन्हा चालू करण्यासाठी विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे.या मोहिमेच्या उद्देशाने पाटोदा तालुक्यातील सर्व शेतकरी आणि लाभार्थींनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला भेट देऊन बंद पडण्याची कारणे जाणून घ्यावीत.तसेच आवश्यक कागदपत्रांची माहिती घेऊन या आठवड्यामध्येच सर्व कागदपत्रे कार्यालयात जमा करावीत.हे हप्ते त्वरित पुन्हा सुरू करण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.त्यासाठी सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५ ते रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पाटोदा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा.जि. बीड येथे वेळ सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:३० या वेळेत कागदपत्रे सादर करावीत असे आवाहन पाटोदा तालुका कृषी अधिकारी ओंकार शेळके यांनी केले आहे.

# बालरोगतज्ञ डॉ. दिनकर राऊत यांचा सावता महाराज प्रतिष्ठान तर्फे सत्कार

बीड । प्रतिनिधी

येथील सावता महाराज प्रतिष्ठानच्या वतीने केज येथील बालरोगतज्ञ डॉ. दिनकर राऊत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, ज्येष्ठ फिजिशन डॉ. साहेबराव भोपळे, डॉ. चौधरी, डॉक्टर अक्षय भोपळे, यांच्यासह सावता महाराज ट्रस्टचे पदाधिकारी, संचालक उपस्थित होते.



केज येथील सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ दिनकर राऊत यांचे ' ' बालकातील हाडाचे संसर्ग' या विषयावरचे संशोधन इंटर नॅशनल जर्नल ऑफ कॉम्पिटिटरी मध्ये प्रकाशित झाले आहे . त्यांच्या संशोधनाची जागतिक पातळीवर दखल घेतली गेली आहे . केज सारख्या ग्रामीण भागात बालरुग्ण वैद्यकीय सेवा करत डॉ दिनकर राऊत यांनी मोलाचे संशोधन कार्य केले आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. दिनकर राऊत यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शामसुंदर घाडगे तसेच आभार संतराम पानखडे यांनी मानले.

# विश्वासघाताची साखळी उघड : फायनान्समधील कौशल्यातून मोटरसायकल चोरीचा पर्दाफाश

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलीस ठाणे हद्दीत मोटरसायकल चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत मोटरसायकल चोरीचे जाळे उघडकीस आणण्यात यश आले आहे. या कारवाईत बीड शहर पोलिसांनी मोटरसायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून आठ (०८) चोरीच्या मोटरसायकली जप्त केल्या आहेत.



सदर प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव कृष्णा उमेश अंतरकर, वय २५ वर्षे, रा. शिवशक्ती नगर, पाथर्डी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर असे आहे.

### फायनान्समधून चोरीकडे गुन्ह्याची पद्धत उघड

प्राथमिक तपासात असे निष्पन्न झाले आहे की, सदर आरोपी यापूर्वी फायनान्स कंपनीत कार्यरत होता. कामाच्या काळात हप्ते थकवलेल्या दुचाकी गाड्या ओढून आणण्याचे (रीपोझेशन) काम तो करीत होता. याच कामातून त्याला वाहन उचलण्याचे कौशल्य व सवय लागली.

याच कौशल्याचा गैरवापर करून आरोपीने पुढे मोटरसायकल चोरी करण्यास सुरुवात केली. चोरी केलेल्या मोटरसायकली तो पाथर्डी परिसरात विक्रीस काढत असे. "मी फायनान्स/बँकेत काम करतो", "या गाड्या हप्ते थकित असल्याने ओढून आणलेल्या

◀◀ पान २ वर

# सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलनाची जय्यत तयारी

## शिरुरकर साहित्यप्रेमींना उत्सुकता; स्वागतासाठी भास्कर चंदनशीव साहित्य नगरी सज्ज

शिरुर कासार । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन दि.१६ ते १७ डिसेंबर रोजी शिरुर कासार येथील एकलव्य विद्यालय, भास्कर चंदनशीव साहित्यनगरी येथे आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्ष अमर हबीब, आमदार सुरेश धस यांचे प्रमुख उपस्थितीत प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होत आहे. संमेलनाची जय्यत तयारी करण्यात आली असून साहित्यप्रेमींना उत्सुकता लागली आहे.

७वे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन शिरुर कासार, जि. बीड



सातव्या सिंदफणा मराठी साहित्य संमलनास शनिवारी भव्य ग्रंथ दिंडीने प्रारंभ होईल. सकाळी जिजामाता चौक ते भास्कर चंदनशीव साहित्यनगरी अशा भव्य ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथदिंडीमध्ये शेतकरी, वारकरी, कवी, लेखक, कलावंत, विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग राहणार आहे. पुणे येथील मॉडर्न

◀◀ पान २ वर


# फुलसांगवी शिवारात बिबट्याने पाडला घोडा आणि मेंढीचा फडशा

## बिबट्याच्या दहशतीने फुलसांगवी परिसर हादरला

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील फुलसांगवी या गावाच्या शिवारामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून आलेल्या मेंढपाळांच्या जागली वरती बिबट्याने हल्ला चढवून मेंढपाळाच्या घोड्याची मेंढीची शिकार

◀◀ पान २ वर



"फुलसांगवी परिसरामध्ये बिबट्याचा वावर हा शेतकऱ्यांसाठी धोका निर्माण झाला आहे. वन विभागाने ही बाब गांभीर्याने घेऊन या परिसरामध्ये आवश्यक ते प्रमाणे कॅमेरे व पिंजरा पिंजरा लावून या प्राण्यांना बंदिस्त करावे शेतकऱ्यांना भयमुक्त करावे

भास्कर सानप
सरपंच फुलसांगवी

### नुकसान भरपाईसाठी प्रस्ताव पाठवणार –अजय देवगुडे

फुलसांगवी शिवारामध्ये शनिवारच्या मध्यरात्री मेंढपाळांच्या जागली वरती बिबट्याने हल्ला करून तेथील त्यांचे सामान वाहतूक करणाऱ्या घोड्याचा व मेंढीचा प्राण घेतला ही बाब मेंढपाळासाठी मोठी नुकसान देणार आहे. त्या मेंढपाळांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करत आहोत. शासनाकडून मेंढपाळांना निश्चित मदत मिळेल.

### तरडगव्हाण शिवारातही शेळीचे पिल्लांची शिकार

तरडगव्हाण भोसले येथील विठ्ठल देवकते हे काही कामानिमित्त अहिल्या नगर कडे गेले अज्ञात वन्य हे सर्व प्राण्यांनी घरी वस्तीवर असलेल्या दोन शेळीच्या पिल्लांची शिकार करून गतप्राण केल्याची घटना रविवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास उघडकिस आली आहे त्यामुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील व्यावसायिक नितीन गिलबिले हत्या प्रकरणात
## फरार माजी नगरसेवकावर 'मकोका', नेमकं प्रकरण

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

चऱ्होली येथे व्यावसायिक नितीन गिलबिले यांच्या खून प्रकरणी फरार असलेला आरोपी माजी नगरसेवक किसन ऊर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर याच्यासह सहा जणांच्या (झींपश उीळाश छशुी) टोळीवर पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई केली आहे. चऱ्होलीत १२ नोव्हेंबरला आर्थिक वादातून गिलबिले यांची डोक्यात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. पोलिसांनी (झींपश उीळाश छशुी) अमित जीवन पठारे, आकाश सोमनाथ पठारे (दोघेही रा. चऱ्होली बुद्रूक), विक्रांत सुरेश ठाकूर (रा. सोळू, खेड), सुमीत फुलचंद पटेल (रा. दिघी), सोन्या लांडगे (रा. पौड) यांना अटक केली आहे. तापकीर (रा. चऱ्होली बुद्रूक) व सोमनाथ पाटोळे (रा. सोळू, खेड) हे दोघे फरार आहेत. पिंपरी चिंचवड पोलिसांनी यातील लांडगे वगळता इतरांवर 'मकोका' कारवाई केली. या आरोपींवर सात गंभीर गुन्हे दाखल आहेत.



चऱ्होली येथे व्यावसायिकाच्या डोक्यात गोळ्या घालून ठार केल्याच्या गुन्ह्यात फरार असलेला आरोपी माजी नगरसेवक किसन तापकीरसह सहा जणांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आर्थिक वादातून नितीन गिलबिले या व्यावसायिकाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती, यामध्ये पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. तर सातवा साथीदार माजी नगरसेवक किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर हा फरार आहे. तोच या गुन्ह्याचा मास्टर माईंड असल्याचे सांगितले जात आहे. दिघी पोलिसांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार या सात जणांच्या टोळीवर मोका अंतर्गत कारवाई करण्यात आली असून यातील आरोपींवर सात गंभीर गुन्हे दाखल आहेत. टोळी प्रमुख अमित पठारे,विक्रांत ठाकूर, सुमित पटेल, आकाश पठारे, सोमनाथ प्रकाश पाटोळे, किसन उर्फ महाराज ज्ञानोबा तापकीर अशी कारवाई झालेल्या टोळीची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी, १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अलंकापुरम रस्त्यावर गिलबिले आणि त्यांच्या ओळखीतील काही जण थांबलेले असताना अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर हे फॉर्च्युनर कारमधून तेथे आले. त्यांनी नितीन गिलबिले यांना कारमध्ये बसवून त्यांच्या डोक्यात जवळून गोळी झाडली. गिलबिले यांचा जागीच मृत्यू झाला. मृतदेह तिथेच टाकून आरोपी घटनेस्थळावरून पसार झाले. खुनाचे नेमके कारणाच्या तपासादरम्यान तापकीर यांचे नाव आरोपींकडून समोर येत असल्याने तपासाची दिशा बदलली आहे. गुन्ह्यातील अचूक कारण, संबंध, आर्थिक किंवा वैयक्तिक वाद; तसेच तापकीर यांचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष हस्तक्षेप याबाबत पोलिसांकडून सखोल तपासणी सुरू आहे. तापकीर यांचा शोध सुरू करण्यात आला असून, दिघी पोलिसांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र पथक तयार केल्याचे सांगण्यात येत आहे. तापकीर अद्याप फरार आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यांपासून शालेय मुलांचे संरक्षण; पिंपरखेडमध्ये ५७.५० लाख रुपयांच्या निधीस मंजुरी

**शिरूर । प्रतिनिधी**

माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून पिंपरखेड (ता. शिरूर ) येथे बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांच्या आणि त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या गंभीर बनलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर ५७. ५० लक्ष रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. हा संपूर्ण निधी पिंपरखेड येथील जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांच्या संरक्षणासाठी देण्यात आल्याने ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.



या निधीतून गावठाण शाळा, अंगणवाड्या आणि वस्तीशाळांभोवती संरक्षक भिंती बांधणे तसेच संरक्षण भिंतींवर काटेरी तार (तारेचे जाळी) लावणे अशी महत्त्वाची कामे केली जाणार आहेत. पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनेत दोन मुलांचा दुर्दैवी मृत्यूच्या घटनांमुळे लहान शालेय मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

शाळांच्या आवारात किंवा आसपास बिबट्याचा वावर असल्याने पालक आणि शिक्षक चिंतेत होते. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरपंच राजेंद्र दाभाडे आणि ग्रामस्थांनी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे संरक्षक भिंतींसाठी निधीची मागणी केली होती. प्रसंगी दिलीप वळसे पाटील यांनी तात्काळ या मागणीची दखल घेत, त्यांच्या आमदार निधीतून शालेय मुलांच्या संरक्षणासाठी तातडीने निधी मंजूर केला आहे. पिंपरखेड येथील गावठाण शाळा संरक्षक भिंत बांधणे - २१ लक्ष, गावठाण प्राथमिक शाळा दुरुस्ती करणे - ७ लक्ष, दत्तवाडी अंगणवाडी संरक्षक भिंत बांधणे १० लक्ष, ढोमेमळा शाळा संरक्षक भिंत बांधणे ८ लक्ष, कोयमहाल वस्ती पारगाव रोड शाळा संरक्षक भिंत बांधणे ६ लक्ष, दाभाडेमळा संरक्षक भिंतीवर काटेरी तार लावणे ४ लक्ष, बोऱ्हाडेवस्ती अंगणवाडी संरक्षक भिंतीवर काटेरी तार लावणे १.५० लक्ष असा एकूण ५७.५० लक्ष रूपये निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती राजेंद्र गावडे यांनी दिली. या निधीमुळे येत्या काळात ही कामे तातडीने पूर्ण होऊन पिंपरखेडमधील शाळा परिसर खऱ्या अर्थाने सुरक्षित होतील, संरक्षक भिंती आणि तारेचे जाळी यामुळे बिबट्यासारखे हिंस्त्र प्राणी शाळेच्या आवारात प्रवेश करू शकणार नाहीत. मुलांचे शिक्षण सुरक्षित होईल असे सरपंच राजेंद्र दाभाडे यांनी सांगितले.

# सनसिटी भागात महाआरोग्य शिबिरातून २६३७ नागरिकांची मोफत तपासणी व उपचार

**पुणे । प्रतिनिधी**

सनसिटी भागात आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिरात रक्त तपासणी, हृदय आजार तपासणी, ईसीजी, मोतीबिंदू, काचबिंदू, डोळ्यांच्या पडद्याच्या शस्त्रक्रिया, दंत तपासणी व दंत उपचार, कॅन्सर आजार उपचार यांसह संपूर्ण शरीराची तपासणी करण्यात आली. सुहासिनी प्रतिष्ठान व शिवसमर्थ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात सनसिटी परिसरातील २६३७ नागरिकांची विनामूल्य तपासणी व उपचार करण्यात आले.

सनसिटी, माणिकबाग, नवीन डीपी रोड, सिंहगड रस्ता परिसरात आयोजित या शिबिरात मोफत केमोथेरपी, रेडिएशन, विविध शस्त्रक्रिया, खुब्याची शस्त्रक्रिया, किडनी स्टोन उपचार, दुभंगलेले किंवा फाटलेले ओठ शस्त्रक्रिया, हाडांची ठिसूळता तपासणी, मधुमेह तपासणी, डायलेसिस,



ऍक्युप्रेशर उपचार तसेच औषध वाटप करण्यात आले. या शिबिराचे आयोजन मंजुषा नागपुरे यांनी केले असून दीपक नागपुरे यांच्या वाढदिवसानिमित्त हे शिबीर घेण्यात आले. यावेळी दीपक नागपुरे यांनी सांगितले की, डी वाय पाटील आयुर्वेदिक, बॉडी वेलनेस सेंटर, सूर्य सह्याद्री हॉस्पिटल, विघ्नहर्ता डायग्नोस्टिक, जहांगीर हॉस्पिटल, भारती हॉस्पिटल, सरदार वल्लभभाई पटेल हॉस्पिटल, सिल्वर बर्स हॉस्पिटल, लायन्स क्लब हॉस्पिटल, देवयानी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, पार्वती नर्सिंग होम, देशपांडे आय हॉस्पिटल, एच. व्ही. देसाई हॉस्पिटल, निरामय आयुर्वेद व निसर्गोपचार चिकित्सालय, डी वाय पाटील डेंटल हॉस्पिटल यांच्यासह फुल बॉडी चेकअप, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष, अन्नधान्य वितरण विभाग आदी विविध विभागांचा या शिबिरात समावेश होता. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत मोठ्या संख्येने नागरिकांनी या शिबिरात सहभाग नोंदविला. यावेळी आयोजिका मंजुषा नागपुरे म्हणाल्या की, या शिबिराच्या माध्यमातून विविध प्रकारच्या मोफत तपासण्या, उपचार तसेच आवश्यक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. आरोग्याचा महायज्ञ राबविताना निरोगी सिंहगड रस्ता हा संकल्पही घेण्यात आला.

# मांडकी पाणीपुरवठा संस्थेच्या अध्यक्षपदी अरविंद जगताप


**वाल्हे । प्रतिनिधी**

मांडकी (ता. पुरंदर) येथील मांडकी सहकारी पाणीपुरवठा संस्थेच्या अध्यक्षपदी अरविंद दिनकर जगताप यांची तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब पांडुरंग भोसले यांची बिनविरोध निवड झाली. मांडकी (ता. पुरंदर) येथील मांडकी सहकारी पाणीपुरवठा संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष छगन जगताप व उपाध्यक्ष मुकुंद जगताप यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्ष-उपाध्यक्षपदाची निवडणूक शनिवार (ता. १३) संस्थेच्या कार्यालयात झाली. या वेळी सहाय्यक निबंधक डॉ. यशवंती मेश्राम यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. यामध्ये अध्यक्षपदासाठी अरविंद जगताप व उपाध्यक्षपदासाठी बाळासाहेब भोसले यांचे एकमेव अर्ज दाखल झाल्याने यांची निवड केल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंती मेश्राम यांनी जाहीर केले. या वेळी दशरथ जगताप, नितीन जगताप, महेंद्र जगताप, विठ्ठल शिंदे, कमल किन्हाळे, लक्ष्मी शिंदे, राहुल शिंदे, माणिक मोरे, दिलीप जगताप, जयराज भोसले आदींसह संस्थेचे सचिव विश्वास जगताप उपस्थित होते. दरम्यान, निवडीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष-उपाध्यक्षांचा सोमेश्वरचे माजी संचालक मोहन जगताप व रामचंद्र जगताप यांच्या हस्ते सत्कार केला. याप्रसंगी अतुल जगताप, प्रवीण जगताप, राहुल जगताप, संजीवन जगताप, अशोक शिंदे, गणेश जगताप, बाळासाहेब धेंडे, भरत किन्हाळे, लालासाहेब भंडलकर आदी उपस्थित होते. महेंद्र साळुंखे यांनी निवडणूक कामी सहकार्य केले. सोमेश्वरचे संचालक विश्वास जगताप यांनी प्रास्ताविक केले. विजय जगताप यांनी आभार मानले.

# पुणे शहरात पाच नवीन पोलिस ठाणी, दोन परिमंडळांना मंजुरी; शासननिर्णयावर शिक्कामोर्तब

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात नव्याने आणखी पाच पोलिस ठाण्यांना, दोन नवीन परिमंडळांना (सहा आणि सात) वित्त व गृह विभागाने मंजुरी दिल्यानंतर आता शासन निर्णयाद्वारेही अखेर मंजुरी मिळाली आहे. याबरोबर तीन उपायुक्त आणि सहा सहायक पोलिस आयुक्त यांच्या पदांना देखील दि. १४ डिसेंबर २०२५ च्या शासननिर्णयाद्वारे मंजुरी देण्यात आली आहे.





लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, येवलेवाडी, मांजरी या पोलिस ठाण्यांना तर तर शहरासाठी परिमंडळ (झोन) ६ आणि परिमंडळ ७ यांना देखील मंजुरी मिळाली आहे. त्याबरोबरच ८३० अधिकचे मनुष्यबळ मंजुर करण्यात आले आहे. विमानतळ पोलिस ठाण्यातून लोहगाव पोलिस ठाणे, येरवडा पोलिस ठाण्यातून लक्ष्मीनगर पोलिस ठाणे, सिंहगडरोड पोलिस ठाण्यातून नऱ्हे पोलिस ठाणे, कोंढवा आणि भारती विद्यापीठमधून येवलेवाडी पोलिस ठाणे, हडपसर पोलिस ठाण्यातून मांजरी पोलिस ठाणे यांना मंजुरी मिळाली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व गृहविभागाला नवीन पोलिस ठाण्यांचा, मनुष्य बळाचा, दोन नवीन झोनचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्या पुणे शहरातील गुन्हेगारीचा लेखा जोखा मांडताना पुण्यात आणखी पोलिस ठाण्यांची आवश्यकता का आहे हे नमूद करण्यात आले होते. त्याच पार्श्वभूमीवर आता ही पाच पोलिस ठाणे शहरात होणार आहेत. त्यावर शासननिर्णयाद्वारे शिक्कामोर्तब करण्यात आले असून त्यासाठी निधीची देखील तरतूद करण्यात आली आहे.सध्याच्या पाच परिमंडळांची पुनर्रचना करून नव्याने दोन परिमंडळांची निर्मीती करण्यात आली आहे. सहा आणि सात या परिमंडळासाठी २ कोटी ३६ लाख ४८ हजार रूपयांची मंजुरी देण्यात आली आहे.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात पहिल्यांदाच एवढ्या कमी कालावधीत पाच पोलिस ठाणी व दोन परिमंडळ निर्माण होण्याची ही पहिलीच वेळ आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा व इतर वरीष्ठ अधिकार्यांच्या मार्गदर्शनात लवकरच ही पोलिस ठाणी कार्यान्वित करण्यात येणार आहे. ही पोलिस ठाणी, झोन मंजुरी बाबत सहायक पोलिस आयुक्त विवेक पवार यांनी वारंवार शासकीय स्तरावर पाठपुरावा केला.

# दुचाकीवरील ताबा सुटला आणि थेट झाडावर आदळला; तरुणाचा जागीच मृत्यू

**खालापूर । प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील घोडीवली-नावंढे रस्त्यावर शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात पोसरी येथील तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. दुचाकीवरील नियंत्रण सुटून रस्त्यालगतच्या झाडाला जोरदार धडक बसल्याने ही दुर्दैवी घटना घडली.अपघातात मृत तरुणाचे नाव अनिरुद्ध खानविलकर (रा. पोसरी, ता. कर्जत) असे आहे.





हा तरुण खालापूरहून पोसरीकडे जात असताना घोडीवली-नावंढे गावाच्या मध्यवर्ती भागात हा अपघात झाला. त्याचे दुचाकीवरील (क्र. एमएच ४६ सीएक्स ५१०३) नियंत्रण सुटल्याने वाहन थेट झाडावर आदळले. धडकेची तीव्रता इतकी होती की अनिरुद्ध याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, वाढता वेग आणि बेफिकीर वाहनचालकांमुळे तरुणांचे प्राण जात असल्याबद्दल नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली.

# युवा सिद्धार्थ बेलमन्नूने रंगवली सुरांची सांज

**पुणे । प्रतिनिधी**

अब तो बडी बेर भयी, हा शांत, करुणामय असा भीमपलास आणि जा जा रे अपने मंदिरवा, या द्रुत बंदिश सादरीकरणाने सवाई गंधर्व महोत्सवाच्या सत्राला शनिवारी सुरवात झाली. बंगळूरु येथील युवा गायक सिद्धार्थ बेलमन्नू यांच्या गायनाने महोत्सवात रंगत आली. गुरू पंडीत विनायक तोरवी यांच्याकडून त्यांना किराणा, ग्वाल्हेर घराण्याचे मार्गदर्शन लाभले आहे.

विलंबित एकतालातील अब तो बडी बेर भयी या रचनेनंतर रागविस्तार करताना सरगमचा सौंदर्यपूर्ण वापर हेही त्यांचे वैशिष्ट्य ठरले. बीरज में धूम मचाए शाम या बंदिशीतून भीमपलासचा एक वेगळा रंग श्रोत्यांसमोर त्यांनी आणला. पाठोपाठ जा जा रे अपने मंदिरवा ही द्रुत बंदिश सादर केली.

पंडीत भीमसेनजींनी लोकप्रिय केलेला माझे माहेर पंढरी हा अभंग आणि संत राघवेंद्र स्वामी यांची कन्नड भक्तीरचना सादर करून त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात समारोप केला. त्यांना भरत कामत (तबला) आणि सुयोग कुंडलकर (हार्मोनिअम), माऊली टाकळकर (टाळ), वैशाली कुबेर, अनुजा भावे - क्षीरसागर यांनी तानपुरा साथ केली.

त्यानंतर भेंडीबाजार घराण्याच्या प्रसिद्ध गायिका अनुराधा कुबेर यांनी मुलतानी रागाने





सादरीकरणाला सुरुवात केली. विलंबित एकतालातील कैसे कर मन समझाऊ ही डॉ. चैतन्य कुंटे यांची रचना, त्याला जोडून डॉ. अरविंद थत्ते यांनी बांधलेला तराणा सादर केली. हा तराणा वैशिष्ट्यपूर्ण होता.

पाठोपाठ आचार्य रातंजनकर यांची त्रितालातील 'नैना नीर झरन' ही बंदिश अनुराधा यांनी सादर केली. प्रतापवराळी या दाक्षिणात्य रागातील बरन साजन सखी ही उस्ताद अमान अली खॉं यांची त्रितालातील रचना सादर करून समारोप केला. त्यांना भरत कामत (तबला), सौमित्र क्षीरसागर (हार्मोनिअम), ओवी तेंडुलकर आणि मृद्गंधा कड (तानपुरा) यांनी साथ केली. सवाईची चढती रंगत अधिक खुलवण्यासाठी प्रसिद्ध बासरीवादक पंडीत रूपक कुलकर्णी स्वरमंचावर येताच रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. त्यांनी राग शुद्ध कल्याण सादर केला. मोजक्या स्वरांतून रागरूप यथार्थपणे दर्शवत त्यांनी मांडणी केली. ईशान घोष यांची तबलासाथ सुरू होताच लयकारीचे वैविध्य उलगडत गेले. ११ मात्रांच्या तालातील काहीसे अनवट वादनही त्यातील माधुर्य जपल्याने रसिकांची भरभरून दाद मिळवून गेले. पाठोपाठ द्रुत त्रितालातील रचनेतून पं. रूपक कुलकर्णी यांनी ईशान घोष यांच्यासह लयीच्या नानाविध स्वराकृती साकारल्या. त्यांना जयकिशन हिंगु यांनी बासरीची साथ केली.

# राज ठाकरेंमुळे उद्धव ठाकरेंचे मोठे नुकसान होणार - रामदास आठवले

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढत्या भेटींमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे गट आणि मनसे यांच्यात युती होण्याच्या शक्यता व्यक्त केल्या जात असताना, यावर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मोठा दावा केला आहे.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्यास मुंबईत मराठी मतांमध्ये फूट पडेल आणि त्याचा थेट फायदा महायुतीला होईल, असे आठवले यांनी स्पष्टपणे सांगितले. राज ठाकरेंना सोबत घेण्याची चूक उद्धव ठाकरेंनी करू नये. राज ठाकरे उद्धव ठाकरेसाठी फायदेशीर ठरणार नाहीत, उलट त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे मोठे नुकसान होईल, असा दावा त्यांनी केला. रामदास आठवले म्हणाले की, राज ठाकरे आमच्यासोबत लोकसभेला होते, तेव्हा आम्हाला फारसा फायदा झाला नाही. मात्र विधानसभेला राज ठाकरे आमच्यासोबत नसतानाही आम्हाला चांगला फायदा झाला. त्यामुळे राज ठाकरे यांच्यासोबत युती ही निवडणुकीच्या दृष्टीने फायदेशीर ठरेलच असे नाही, असे देखील त्यांनी म्हटले आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या हातून मुंबई हिसकावून घेण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी महायुती मैदानात उतरणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. मुंबईचा महापौर हा महायुतीचाच होईल, हे निश्चित आहे, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच मुंबईत २५ जागांपैकी किमान १६ जागा आरपीआयला मिळाव्यात, अशी आमची मागणी असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# पुणे महापालिकेच्या पेट स्कॅन सेंटरचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या पेट स्कॅन सेंटरचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी होणार आहे. पुण्याचे माजी खासदार दिवंगत गिरीश बापट यांचे नाव या सेंटरला देण्यात येणार आहे.

महापालिकेच्या माध्यमातून सुरू होत असलेला देशातील अशा स्वरुपाचा हा पहिलाच प्रकल्प आहे. भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे हे महापालिकेत सभागृह नेते असताना त्यांनी या सेंटरची कल्पना सर्वप्रथम मांडली होती आणि त्यासाठी सुरुवातीला आठ कोटी रुपयांची तरतूद महापालिकेच्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. या सेंटरमध्ये अत्यल्प दरात आवश्यक रुग्णांची पेट स्कॅन चाचणी केली जाणार आहे. पब्लिक-प्रायव्हेट मॉडेलवर हे सेंटर कार्यरत राहणार आहे. पुणे महापालिका आणि एक्स व्हिजन डायग्नॉस्टिक सेंटरच्या माध्यमातून त्याचे संचालन करण्यात येईल. पुणे शहरात काही खासगी रुग्णालयांमध्ये पेट स्कॅन सुविधा उपलब्ध आहे. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये ही सुविधा नव्हती. शहराची वाढती लोकसंख्या आणि कर्करोगाचे लवकर निदान करण्यासाठी पेट स्कॅनिंगचे असलेले महत्त्व



ओळखत धीरज घाटे यांनी महापालिकेच्या अर्थसंकल्पात यासाठी सर्वप्रथम तरतूद केली होती. या सेंटरची उभारणी करण्यासाठी महापालिका तसेच राज्य सरकार यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्याचे कामही त्यांनी केले होते.सणस मैदानासमोरील हिराबाग कोठी येथे हे सेंटर उभारण्यात आले आहे. सोमवार, १५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता त्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर जी मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, शहरातील पक्षाचे सर्व आमदार आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# कुलता एक आधार गेला, पण कायद्याचा दिलासा; पीएमपी बस अपघातातील मृताच्या पालकांना २० लाखांची मदत

**पुणे । प्रतिनिधी**

पीएमपीएल बसची धडक बसून झालेल्या अपघातात एकुलता एक २२ वर्षीय अपंग मुलगा गमावलेल्याकुटुंबियांना दिलासा मिळाला आहे. लोकअदालतीमध्ये तडजोडीअंती दावा निकाली काढत २० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा निर्णय झाला आहे. लोकअदालतीमध्ये न्यायाधीश सी. पी. भागवत आणि ॲड. अतुल गुंजाळ यांच्या पॅनेलसमोर हा दावा निकाली निघाला. अर्जदाराचे वकील ॲड. विकी नवले आणि विमा कंपनीचे वकील ॲड. सुरेंद्र दातार यांनी तडजोडीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.रोहन (नाव बदलेले आहे) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. तो अपंग होता. एका खासगी दुकानामध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणून तो काम करीत होता. काम करतानाच तो बीएडचे शिक्षण घेत होता.

जून २०२४ मध्ये रोहन पुलगेट बसस्थानकात उभा होता. त्यावेळी बसस्थानकात चुकीच्या दिशेने आलेल्या बसचा त्याला धक्का लागला. या अपघतात रोहन मृत्युमुखी पडला. याप्रकरणी त्याच्या आई आणि वडिलांनी ॲड. विकी नवले यांच्यामार्फत पीएमपीएल आणि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीविरुद्ध दावा दाखल केला होता. येथील मोटार अपघात न्यायप्राधिकरण येथे दावा दाखल झाला होता. याप्रकरणी पीएमपीएलतर्फे ॲड. अतुल गुंजाळ, इन्शुरन्स कंपनीतर्फे ॲड. सुरेंद्र दातार यांनी काम पाहिले.

# मुंबई-पुणे प्रवास अवघ्या ९० मिनिटांत होणार पूर्ण; नितीन गडकरींचा मास्टरप्लॅन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-मुंबईअसा प्रवास करणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुंबई पुणे प्रवासाला जवळपास अडीच ते तीन तास लागतात. जाताना घाटामध्ये जर ट्रॅफिक लागलं तर मग तेच अंतर पार करायला चार ते पाच तासही कमी पडतात. मात्र आता मुंबई पुणे (र्चीलरळ झींपश क्षींपशू) अंतर अगदी ९० मिनिटांत पार करता येणार असल्याची माहिती समोर आली आहे. आता मुंबई पुणे सुपरफास्ट प्रवास होणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी (छळींळप ऋरवज्ञरीळ) यांनी मोठी घोषणा केली आहे. येत्या वर्षभरात राज्यात दीड लाख कोटी रुपयांची विकासकामे मंजूर झाली असून, त्यातील तब्बल ५० हजार कोटी रुपयांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात येणार आहेत, अशी माहिती गडकरी यांनी दिली आहे. या विकासकामांमध्ये पुणे



आणि मुंबईकरांचे आयुष्य अधिक वेगवान बनवणाऱ्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश असणार आहे. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी पुणे-मुंबई आणि पुढे दक्षिणेकडे जाणाऱ्या प्रवासाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण प्रकल्प यावेळी जाहीर केला. पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेला जोडून एक सामायिक एक्सप्रेस हायवे तयार करण्यात येत आहे. हा ग्रीनफिल्ड लिंक अटल सेतू ते जेएनपीटी चौक ते पुणे-शिवार जंक्शन असा १३० किलोमीटरचा असणार आहे. फक्त पुणे जिल्ह्यासाठी गडकरींच्या मंत्रालयांतर्गत सुमारे ५० हजार कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत, जी येत्या तीन महिन्यांत सुरू होतील, असा दावा त्यांनी केला. यामध्ये अनेक महत्त्वाच्या एलिव्हेटेड प्रकल्पांचा समावेश आहे तळेगाव-चाकण-शिक्रापूर हा ४ हजार २०७ कोटींचा चार स्तरावरील महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. यात खाली रस्ता, त्यावर दोन उड्डाणपूल आणि सर्वात वर मेट्रो मार्ग असेल. याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. हडपसर ते यवत ५ हजार २६२ कोटींचा हा प्रकल्प एलिव्हेटेड स्वरूपाचा असणार आहे, अशी माहिती देखील त्यांनी दिली आहे.